
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क




• पुणे • वर्ष १३ वे • अंक ४ था •जानेवारी - मार्च २०१८ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-






श्रीमद् भगवत गीता अथ पञ्चदशोऽध्यायः

श्रीभगवानुवाच - ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् । छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ।।१।।

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ स्थापना १९९१

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

वर्ष १३ वे | जानेवारी – मार्च २०१८ | अंक ४ था

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर | सचिव : श्री. गणेश गुर्जर | कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर |
| मोबा. : ९८१९८८५६६५ | मोबा. : ९८९०९९०११३ | मोबा. : ९८२०४ १७९८१ |

संस्था नोंदणी क्र. महा–१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६

संपादक : श्री. श्रीगजानन गुर्जर
पुणे ९९७०१ ७४८१८ / ८८०६३ ९५८८० (WhatsApp)

शहर प्रतिनिधी
श्री. प्रसाद पंडीत, मुंबई, ९८६९१ ५५२१५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
श्री. प्रदिप हळबे, डोंबिवली, ९८३२१ ६३६५९
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर ९८६०२ ५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९
सौ. मानसी मोघे, सातारा, ९०११० ८२३०८
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५ ७९४००
श्री. मिलिंद पांवनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
श्री. हेमंत हिर्लेकर, पुणे, ९८२२० ४२८६३
श्री. निळकंठ मुळये, बडोदा, ९८२५६ ८५९७३
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२
श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६९७
श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८
श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२ ०५६९०
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५

ऑफिस संपर्क : ०२०–२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक – श्री. श्रीगजानन गुर्जर

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/–, रु. ५००/– अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षेसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी **(पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे–३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे).** शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक ०५५२१०११०००४००८ असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा **कृपया मनिऑर्डर पाठवू नये.**

**संपादक : श्रीगजानन गुर्जर**

### जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ४००/– | रु.१५००/– |
| अर्धा | रु. ८००/– | रु. ३०००/– |
| पूर्ण | रु. १६००/– | रु. ६०००/– |
| शुभेच्छा | रु. २५०/– | रु. १०००/– |
| पूर्ण पान रंगीत | रु. २५००/– | रु. १००००/– |
| पृष्ठदान | रु. १००/– | – |

**नियतकालिकाचे नाव :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०
**संपादक :** श्री. श्रीगजानन गुर्जर
**मुद्रक :** श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

संपर्क

# अनुक्रमणिका


- संपादकीय ३
- .... आणि सौ. आजारी पडते ४
- देहदानासंबंधी काही उपयुक्त माहिती ६
- सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राचीन गुरुकुल पद्धतीने सुरु असलेली वेदपाठ शाळा ७
- विठ्ठलापूर-सांखळी येथील श्री विष्णुयाग अनुष्ठान ८
- 'अनमोल' देह- ९
- चित्तशुद्धीकरिता बारा राशी आणि त्यांचे काही दुर्मिळ उपयुक्त मंत्र ११
- मंदिराचे अंतरंग - श्री कर्णेश्वर मंदिर १२
- भक्त १५
- ब्रह्मराक्षस १६
- कॅलरी किंवा उष्मांक म्हणजे नेमकं काय? १७
- पानावरच्या फेणी आणि मूगडाळ कचोरी १८
- एकाक्ष नारळ १८
- संस्थावृत्त :-
  - क. ब्रा. संघ, सिंधुदुर्ग जिल्हा १९
  - क. ब्रा. संघ, नाशिक - गौरवदिन १९
  - क. ब्रा. संघ, ठाणे - गौरवदिन १९
  - क. ब्रा. संघ, हुबळी - गौरवदिन २०
  - क. ब्रा. संघ, पुणे - गौरवदिन २०
  - रंगी रंगला उत्सव - राहूलराज २१
  - क. ब्रा. संघ, रत्नागिरी - गौरवदिन २२
  - क. ब्रा. संघ, पुणे - कोजागरी पौर्णिमा कार्यक्रम २२
  - निवेदन - क. ब्रा. संघ, गोवा २३
  - क. ब्रा. सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) जि. ठाणे - रक्तदान शिबीर २३
  - क. ब्रा. सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) जि. ठाणे - दिवाळी पहाट २४
  - क. ब्रा. महासंघाची पुणे येथील पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा २४
  - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू श्री. नितीन करमळकर यांचा सत्कार २४
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा २५
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक २५
  - कऱ्हाडे ब्राह्मण रत्नागिरी संघाचा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा २६
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर २७
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे २७
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई २८
- मृत्यूनंतर आत्म्याचा प्रवास २९
- यशापयशाची जबाबदारी ३२
- घसा दुखत आहे? ३४
- कविता - माणूस व पाऊस ३५
- कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई राज्यपालांच्या हस्ते 'flag day award' सन्मानाने गौरवांकित


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

# संपादकीय

वर्षाभिनंदन,

आपणां सर्वांना नवीन वर्षाच्या, तसेच वर्षारंभी जानेवारी महिन्यात येणाऱ्या 'मकर संक्रांती'च्या अनेकानेक गोड शुभेच्छा!

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या जून २०१६ च्या पुणे येथे झालेल्या सभेत झाशी राणी लक्ष्मीबाईंचा जन्मदिवस दरवर्षी १९ नोव्हेंबरला 'गौरवदिन' म्हणून साजरा करण्याचा निश्चय झाला होता. त्याप्रमाणे सलग दुसऱ्या वर्षी हा गौरवदिन बऱ्याच संघांनी साजरा करून त्याचे इतिवृत्त आम्हास क्षणचित्रांसमवेत पाठवून दिले. त्यांना आम्ही योग्य ती प्रसिद्धी ह्या अंकात दिली आहे. 'गौरवदिन' उत्साहात साजरा करणाऱ्या सर्व संघाचे मन:पूर्वक अभिनंदन. उर्वरीत संघांना ह्यापासून प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा आहे. झाशी राणींचा 'गौरवदिन' आपण यापुढे सातत्याने दरवर्षी साजरा करणार आहोत आणि यामध्ये निरनिराळ्या खेळात, उपक्रमात उल्लेखनीय नैपुण्य संपादन केलेल्या आणि नेत्रदीपक यश प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींचा गौरव करत आहोत. काही संघांनी गौरवदिन साजरा करताना वैविध्य आणले आहे; त्याचेही विशेष कौतुक.

महासंघाने पूर्वी घोषित केल्याप्रमाणे १ एप्रिल २०१७ पासून शैक्षणिक तसेच वैद्यकीय मदत योजना जाहीर केली आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त 'संपर्क' त्रैमासिकाच्या एप्रिल-जून २०१७ च्या अंकात प्रसिद्ध केले होते. संबंधितांनी कृपया आपापल्या संघाच्या अध्यक्ष / कार्यवाह किंवा कार्यकारिणी सदस्यांशी संपर्क साधून या संधीचा उचित लाभ घ्यावा. तसेच सर्व संघाचे अध्यक्ष / कार्यवाह ह्यांना विनंती की, याबाबतचा योग्य तो प्रचार/प्रसार आपल्या कार्यक्रमातून, विविध सभांतून करून महासंघाच्या या योजनेस योग्य तो प्रतिसाद मिळेल असे पाहावे.

'संपर्क' त्रैमासिकात आपण आपले विचारधन लेख स्वरूपात तसेच स्वरचित कविता, चुटकुले, रेसिपी, प्रवासवर्णन, संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे सविस्तर वृत्त, फोटो वगैरे साहित्यरूपात पाठवू शकता. त्यास योग्य ती प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न आम्ही करतो. या निमित्ताने सर्वांसाठी हे एक व्यासपीठ निर्माण झाले आहे.

'संपर्क'चा प्रसार होण्याच्या दृष्टीने संघातील सर्व सभासदांना विनंती की- आपल्या ओळखीतील, नात्यातील जे ज्ञातिबांधव, सभासद अजून 'संपर्क'चे वर्गणीदार झालेले नसतील; अशांना माहिती देऊन वर्गणीदार सभासद होण्याची विनंती करावी.

**'संपर्क'ची वर्गणी बँक ऑफ इंडिया, कर्वे नगर शाखा, खाते क्रमांक ०५५२१०११०००४००८ ह्या खात्यातच कृपया भरावी. म्हणजे ती आपल्या नावे जमा होईल. अन्यत्र कोणत्याही खात्यात भरू नये. काही सभासदांनी ती नजर चुकीने अन्य खात्यात भरली होती, म्हणून पुन्हा हे नमूद करत आहे.**

आमच्या सर्व वर्गणीदार सभासदांना, जाहिरातदारांना आणि हितचिंतकांना नवे वर्ष २०१८ हे सुखाचे, समृद्धीचे आणि आरोग्यदायी जावो.

पुन:श्च नववर्षाभिनंदन
तिळगुळ घ्या, गोड बोला.



**श्रीगजानन गुर्जर**
**संपादक**

# .... आणि सौ. आजारी पडते

श्री. स. ना. तथा बाळासाहेब भाटे

'योगा द ग्रेट!' असे मला माझ्या प्रत्येक आजारपणात ठणकावून सांगणारी सौ. आजारी पडते. खरं तर हिच्या तुलनेत माझी प्रकृती अगदीच तोळा-मासा. लवंगेने उष्णता आणि वेलदोड्याने थंडी-इतकी नाजूक. पण हिला मात्र प्रकृतीची दैवी देणगी. आजारपण हा शब्दप्रयोगच हिच्या शब्दकोशात नव्हता. त्यामुळे माझ्या प्रत्येक आजारपणात 'योगा द ग्रेट' हा बोध-डोस मी अनेक वेळा पचविला. या वेळी मात्र फासे उलटे पडले. कॉम्प्युटरची तब्येत बिघडू नये म्हणून हिच्या ऑफिसमधल्या वरिष्ठांनी ऑफिस स्वच्छतेचा फतवा जारी केला आणि या स्वच्छता मोहिमेत हिच्या पायाला विषारी किडा किंवा डास चावल्याचे निमित्त झाले अन् सौ.ने अंथरूण धरले. सुरुवातीला ताप, पाय दुखणे यामुळे आजाराची फारशी गंभीरता जाणवली नाही. शिवाय डॉक्टरांची औषधे चालू होतीच. तथापि आठ दिवस झाले तरी प्रकृतीत काहीच सुधारणा होईना. पायाची जखम बाळसे धरू लागली. त्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांना पाय दाखविण्याचा निर्णय आम्ही घेतला आणि त्याची कार्यवाही त्वरित केली. तज्ज्ञ डॉक्टरांनी पायाची जखम बघितल्यावर चिंतेच्या सुरात आजाराची गंभीरता निवेदन केली आणि ''अजून थोडा जरी उशीर झाला असता तर एक पाय जमिनीवर टेकवता आला नसता. तथापि, तुम्ही फार उशीर केला नसल्याने काळजीचे कारण नाही'', असे सांगितले. डॉक्टरांच्या या शब्दांनी आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला. दोन महिन्यांच्या बेडरेस्टचे फर्मान आणि औषधांची शिदोरी यासह आम्ही घरी दाखल झालो. स्वतंत्र कॉटची व्यवस्था करून व कॉटची पायाकडील बाजू विटांच्या साह्याने उंचावून सौ.नी बेडरेस्टचा शुभारंभ केला आणि 'पायाला विषारी किडा चावून सौ. आजारी पडते' या कथानकाचा आरंभ सुरु झाला.

आजारी न पडताच डॉक्टरांच्या सहकार्याने आजारी रजा, घेतली असेल या विचारांनी बहुधा ऑफिसमधल्या सहकाऱ्यांनी सुरुवातीला हिच्या आजारपणाची फारशी दखल घेतली नाही. मात्र बेडरेस्टची वार्ता जशी सर्वांना समजली, तसा प्रत्येकाच्या काळजाचा ठोका चुकला. दुसऱ्या दिवशी मैत्रिणींचा एक ताफा दुपारच्या सुट्टीत प्रकृतीची चौकशी करण्यासाठी घरी दाखल झाला. घरात प्रवेश करताच ''अय्या! भाटे तू चक्क आजारी? विश्वासच बसत नाही!'' या वाक्याने सुसंवादाला सुरुवात झाली. सौ.ने नजरेनेच मला चहा टाकण्याची खूण केली आणि मी स्वयंपाकघराचा ताबा घेतला. इतक्या मंडळींचा चहा करण्याचा बाका प्रसंग; पण न डगमगता मी ती जबाबदारी स्वीकारली. पावसाळ्याचे दिवस, हवेत गारवा म्हणून चहात आलं टाकून मी चहा केला. बाहेर रंगलेल्या गप्पांच्या मैफलीत चहा देताना, 'उगीचच तुम्ही त्रास घेतलात, चहाची खरंच आवश्यकता नव्हती' या सहानुभूतीच्या वाक्यांनी माझा उत्साह वाढला. मी स्वयंपाकघरात जाऊन चहा घेतला आणि जिभेवर पांचट चहाची चव रेंगाळली. जाताना हिच्या सर्व मैत्रिणींनी मात्र चहाचे कौतुक केले आणि मला त्यांच्या चांगुलपणाचा दृष्टांत झाला. माझी स्वेच्छानिवृत्ती अशा प्रकारे सत्कारणी लागेल, असे मला कधी वाटले नव्हते.

आळीत पण आता आजारपणाची वार्ता सर्वांना श्रुत झाली होती. भेटायला येणाऱ्या मंडळींचा ओघ सुरूच होता. माझे परमस्नेही अगदी सकाळीच दरवाजातून आरोळी देत घरात स्थानापन्न होताच म्हणाले, ''दुसऱ्यांना आजारी पाडणाऱ्या तुम्ही आजारी कशा पडलात?'' त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण संवादफेकीने वातावरणात हास्याची लहर पसरली. माझ्याकडे पाहत म्हणाले, ''आमचे बाळासाहेब गरीब माणूस!'' चेहऱ्यावर गरीबपणाची भावमुद्रा दाखविण्याचा माझा केविलवाणा प्रयत्न. 'हात दाखवा' इतक्या सहजतेने 'पाय दाखवा' म्हणताच सौ.ने आज्ञाधारकपणे पाय दाखविला. जखमेचे निरीक्षण केल्यावर त्यांनी पायाच्या बोटांची हालचाल करण्यास सांगितले. बोटांची हालचाल पाहताच म्हणाले, ''काळजी करण्याचे कारण नाही. आजार गंभीर नाही. लवकर बऱ्या व्हाल.'' या माणसाला एवढे वैद्यकीय ज्ञान असेल, याची मला यापूर्वी अंधुकशीदेखील कल्पना नव्हती.

भेटायला येणारी प्रत्येक व्यक्ती नवनवीन घरगुती उपाय सुचवत होती आणि माझ्या ज्ञानात भर पडत होती. ''दीदी, एक रामबाण उपाय सुचवू का? सांबराचे शिंग सहाणेवर उगाळून पायाला

त्याचा लेप द्या. आठ दिवसांत पाय ठणठणीत बरा झाला म्हणून समजाच. डॉक्टरांना काय कळतंय?'' एक नवा उपाय. त्यांच्या बोलण्यातला हा आत्मविश्वास माझ्या ठायी असता तर मी किती मोठा झालो असतो, असे मला उगीचच वाटू लागले. सांबर, काळवीट अशा वन्य जीवांची बंदुकीने हत्या केल्याप्रकरणी एका प्रख्यात सिनेनटाला आघाडीच्या चौकशीला सामोरे जावे लागल्याचे वर्तमानपत्रात वाचल्याचे मला स्मृतिपटलांनी लक्षात आणून दिले आणि मी सोयिस्करपणे हा नवा उपाय विसरून गेलो. तब्येतीची चौकशी करण्यासाठी आलेल्या एका गृहस्थांनी डॉक्टरांच्या औषधाचे प्रिस्क्रिप्शन पाहण्यास मागितले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचल्यावर; अर्थात हे मी गृहीत धरले- योग्य दिशेने औषधोपचार सुरू असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. डॉक्टरांच्या औषधाचे प्रिस्क्रिप्शन फक्त केमिस्टवाल्यालाच वाचता येते, या माझ्या समजुतीला यामुळे तडा गेला. रक्तचंदनाची बाहुली आणि हळकुंड उगाळून त्याचा गरम लेप, निरगुडी-अडुळशाची पाने उकळून वाफ घेणे, पोटिसासारखी बांधणे- असे विविध उपाय पुढे आले.

''नेमका माझाच पाय, विषारी किड्याला बरा दिसला,'' इथून सुरुवात करीत भेटायला आलेल्या स्त्रीवर्गाशी शरीराचे भोग, प्रारब्ध, पूर्वसुकृत, योगा, मॉर्निंग वॉक अशा अनेक विषयांवर सौ. प्रभुत्वाने बोलत असत. बेड रेस्ट फक्त पायालाच होती. प्रत्युत्तरादाखल स्त्रीवर्गाकडून वाढती महागाई, सासवा-सुनांची नाजूक नाती, सोन्याचे वाढते भाव, एक-दोन ग्रॅमचे सोन्याचे नवीन दागिने, मॉन्सून साड्यांचा सेल... अशा जिव्हाळ्याच्या विविध विषयांना तोंड फोडले जात असे आणि या रंगलेल्या गप्पांच्या मैफलीचा आनंद, स्वयंपाकघरात चहा टाकत असताना घेण्यात मी धन्यता मानीत असे. एव्हाना उत्तम चहा करण्यात मी चांगलीच प्रगती केली होती, कारण एकदा दस्तुरखुद्दनी चहाचे कौतुक केले आणि मला आभाळ ठेंगणं वाटू लागलं. भेटायला येणाऱ्या हिच्या मैत्रिणींनीसुद्धा 'भाट्यांच्या हातचा चहा घेण्यास परत येऊ' असं सांगताच, आपण चहाची टपरी टाकली तर ती उत्तम चालेल, या निष्कर्षाप्रत मी येऊन ठेपलो.



परमेश्वरी कृपा, डॉक्टरांचे परिश्रम, भेटायला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या सदिच्छा-प्रेम-जिव्हाळा, आपलेपणा यामुळे हिची बेडरेस्ट संपली आणि आम्ही एका अग्निदिव्यातून बाहेर पडलो. सर्वांचे ऋण मनावर कोरले गेले. आम्हाला बिस्किटांच्या पुड्यांचा स्टॉक पुढे दोन महिने पुरला. येणारी फळफळावळ खराब होऊ नये म्हणून मी वेळीच योग्य काळजी घेऊन माझ्या जिभेचे चोचले पुरवल्यामुळे आता माझ्या प्रकृतीनेसुद्धा आकार घेतला असून, तोळामासा या संज्ञेतून मी बाहेर पडलो आहे. स्वयंपाकघरातील कार्यक्षेत्राच्या कक्षा आता मी रुंदावल्या असून, पोहे, शिरा, उप्पीट तयार करण्यापर्यंत मजल मारली आहे. त्यामुळे तुम्ही पुन्हा याल, त्या वेळी तुमचं स्वागत यापैकी एक गरम डिश व पांचट नसलेल्या चहाने केले जाईल. घाबरू नका, तुमचं पोट बिघडणार नाही. खात्री बाळगा. अहो, मध्यंतरीच्या काळात भरपूर रिहर्सल झालीय. छे, हो!

येण्याला काही आजारपणाचेच कारण हवे असे नाही. हो, मात्र येण्यापूर्वी फोन मात्र जरूर करा. कारण पूर्वतयारीला वेळ नको का? म्हणून तर माझा मोबाईल नंबर दिला आहे- ९४२२४०२६४९. शेवटी काय- 'योगा द ग्रेट!

# देहदानासंबंधी काही उपयुक्त माहिती

– श्री. किरण शं. नानिवडेकर

रक्तदान, नेत्रदान याबाबत समाजात काहीशी जागृती दिसून येत असली तरी मरणोत्तर देहदानाबाबत अजून फारशी जागृती झालेली दिसून येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे- पूर्वापार चालत आलेल्या रूढी, कुटुंबीयांच्या भावना, धार्मिक चाली-रीती आणि या विषयाबाबत मिळणारी अपुरी माहिती. वैद्यकीय महाविद्यालयांना अभ्यास व संशोधनासाठी नैसर्गिक मृत्यू आलेले व चांगल्या स्थितीत असलेले देह फारसे मिळत नाहीत. मरणोत्तर देह दफन केला काय किंवा त्याचे दहन केले काय- देहाला काहीच फरक पडत नाही. तो शेवटी पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पंचमहाभूतांतच विलीन होऊन जातो. शेवटी एकच प्रश्न राहतो, तो म्हणजे, मृताच्या जवळच्या नातेवाईकांच्या भावनांचा व त्यांच्या मानसिक तयारीचा. परंतु इच्छुक दात्याने आपल्या हयातीतच यावर विचार करून कुटुंबीयांच्या संमतीने निर्णय घ्यायला काय हरकत आहे?

वानवडी, पुणे ४११०४० येथील लष्करी वैद्यकीय महाविद्यालयाकडून देहदानाबाबत मला मिळालेली माहिती वाचकांसाठी खाली देत आहे, त्यावर जरूर विचार करावा. मी स्वतः सदर संस्थेकडे देहदानाचा फॉर्म भरून दिला आहे. या संस्थेत दान केलेले देह सन्मानपूर्वक स्वीकारले जातात, असा मला विश्वास वाटतो.

१) कोणीही व्यक्ती देहदानाचा फॉर्म स्वेच्छेने भरून देऊ शकते. नैसर्गिक कारणाने मृत्यू झाल्याचा सक्षम डॉक्टरांचा दाखला व ग्रामपंचायत/ नगरपालिका/ म.न.पा. यांचा पास असेल, तर देहदानासाठी मुंबई शरीरशास्त्र कायदा कलम ५(ब) अनुसार नातेवाइकांना पोलीस किंवा कॉरोनरची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. (संदर्भ- कॉरोनर कोर्ट परिपत्रक दि. २२ जानेवारी १९८७)

२) मेडिको-लीगल प्रकरण म्हणजे आत्महत्या, अपघाती मृत्यू असेल, देहाचे वजन ९० किलोपेक्षा जास्त असेल किंवा देह एचआयव्ही/ एचबीएसएजी पॉझिटिव्ह बाधित असेल, अतिस्थूल असेल, किंवा स्वीकारण्यासारख्या अवस्थेत नसेल तर कॉलेज देहदान स्वीकारत नाही.

३) पारंपरिक पद्धतीनुसार मृतदेहावर करावयाचे धार्मिक संस्कार (दहनापूर्वीचे) करावयास कॉलेजची हरकत नाही. स्मशानात हे संस्कार केल्यानंतरही एएफएमसी कॉलेजकडून मृतदेह स्वीकारला जातो. देह स्वीकारल्यानंतर त्यावर कॉलेजचा हक्क राहतो आणि नंतर त्यांचे नियम व पद्धतीप्रमाणे त्याची पुढील व्यवस्था केली जाते. कोणतेही विशिष्ट भाग (अस्थी वगैरे) घरी धार्मिक संस्कार /विधीसाठी परत दिले जात नाहीत.

४) देहदान करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने विहित नमुन्यातील फॉर्म आपला फोटो, दोन साक्षीदारांच्या सह्या इ. सह लष्करी वैद्यकीय महाविद्यालयाकडे पाठविल्यानंतर त्याची रीतसर पोच व देहदान-कार्ड दात्याकडे पाठविले जाते.

५) पुणे म.न.पा. हद्दीत मृतदेह असेल, तर सूचना मिळाल्यानंतर देह नेण्याची व्यवस्था कॉलेज करते. पुणे म.न.पा.चे हद्दीबाहेर असेल तर जवळच्या नातेवाइकांनी देह वानवडी, पुणे-४० येथे वरील कॉलेजपर्यंत स्वतः नेऊन देहदान कार्ड, डॉक्टरांचा दाखला व पास यासह संबंधित ड्यूटी अधिकाऱ्याचे ताब्यात द्यावा लागतो. त्यासाठी दिवस व वेळ खालीलप्रमाणे :-

सोमवार, मंगळवार, गुरुवार व शुक्रवार :- सकाळी ८.३० ते सायंकाळी ४.३० पर्यंत. बुधवार व शनिवार :- सकाळी ८.३० ते दुपारी १.३० पर्यंत. (वाहतूक व्यवस्थेकरिता ०२०-२६०२६०४० या क्रमांकावर संपर्क करावा.


६) डोळे व किडनी दान करण्याबाबत संस्थेचा नेत्रविभाग व शस्त्रक्रिया विभाग यांच्याकडे फोन क्र. ०२०-२६०२६०३५ व २६०२६०४१ यावर संपर्क करावा.

मला मिळालेली माहिती मी आपणासमोर सादर करण्याचे काम केले आहे. अर्थातच इच्छुकांनी आपल्या कुटुंबीयांना विश्वासात घेऊन नंतरच याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. तो त्यांचा पूर्णपणे वैयक्तिक निर्णय असणार आहे.

श्री. किरण शंकर नानिवडेकर
पाषाण, पुणे - ४११०२१.
मो. ९८८१२०१५४३

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राचीन गुरुकुल पद्धतीने सुरु असलेली वेदपाठ शाळा

वेदमूर्ती श्री. मुखणे गुरुजींनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राचीन गुरुकुल पद्धतीने सुरु केलीली वेदपाठ शाळा सन १९९६ पासून कार्यरत असून ती वायंगणी, ता. मालवण येथे आहे.



श्री. दत्तात्रेय महादेव मुखणे गुरुजी यांनी १९७५ ते ९० या काळात पुण्याला आणि २ वर्षे नाशिकमध्ये अध्यापन केले होते. आज त्यांच्या वेदपाठ शाळेत २२ मुले शिक्षण घेत आहेत. एकंदर अभ्यासक्रम १२ वर्षांचा आहे. ऋग्वेदाचे अध्ययन- विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार १२ ते १५ वर्षांत अभ्यासक्रम पूर्ण होतो. संपूर्ण मौखिक म्हणजे वेदपाठांतर. ५०% गुण मिळविलेला विद्यार्थी पास होतो. ५ वर्षे झाल्यानंतरची परीक्षा १०वी समकक्ष, ८ वर्षे झाल्यानंतरची परीक्षा १२वी समकक्ष, १२ वर्षे झाल्यानंतरची परीक्षा पदवी समकक्ष (घनपाठी, वेदचूडामणी)

१० वर्षांच्या आतील मुलांना प्रवेश मिळतो. वयाच्या २० ते २५ वर्षांपर्यंत अध्ययन संपले पाहिजे. सध्याची मुले पुणे, गोवा, कर्नाटक, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या भागातील आहेत.

वेदचूडामणी झालेले शाळेचे विद्यार्थी खालीलप्रमाणे-

१) गोपाळ जोशी- पुणे (महाराष्ट्र), २) वल्लभ मुंडले- सिंधुदुर्ग, तेंडोली (महाराष्ट्र), ३) भार्गव टेंगशे- पैंगिणी, गोवा, ४) निळकंठ जोगळेकर- गोकर्ण (कर्नाटक), ५) श्रीराम मुखणे- मालवण (महाराष्ट्र) (गुरुजींचा मुलगा), ६) कै. पाध्ये गुरुजी- रत्नागिरी, ऋग्वेद १४ ग्रंथ सलग पाठांतर, दशग्रंथीसहित घनपाठी, ७) श्रीराम वडेर (इचलकरंजी) दशग्रंथी घनपाठी आहे. चूडामणी परीक्षा पास नाही.

पहाटे ४.३० वाजता दिनचर्या सुरू होते. रोज १० ते १२ तास पठण. यासाठी शारीरिक व बौद्धिक क्षमता आवश्यक. दशग्रंथी अध्ययन २५ वर्षांपर्यंत होऊ शकते. पारायण कठीण असते.

वेदपरीक्षा घेणाऱ्या संस्था - पुण्याला २, कांची १, शृंगेरी १, म्हैसूर १.

पुण्याच्या संस्था भागशः परीक्षा घेतात. उदा.- ५ वर्षे अध्ययन झाले की, ८ वर्षानंतर इ. पाठशाळेत गुरुकुल पद्धतीने निवास व अध्ययन. विद्यार्थ्याने सर्व कामे स्वतः केली पाहिजेत. जेवण करणे, गोपालन- दूध काढणे, गुरे चरावयास नेणे, गुरांना अंघोळ, आश्रम सारवण- स्वच्छता, आश्रमाची शेती, लावणी, कापणी इ. कामे.

पालकाकडून कोणतेही शुल्क घेत नाहीत. सरकारी किंवा संस्थेचे कोणतेही अनुदान घेत नाहीत. न्यास किंवा संस्था नाही. कोणीही ऐच्छिक देणगी दिली तर स्वीकारतात. वस्तुरूप देणगी तांदूळ, गहू, तेल, पंचे, धोतर इ. स्वीकारली जाते.

**— श्री. वि. गो. उमर्ये**

**मो. : ९४२११ ३७६६७**

# विठ्ठलापूर-सांखळी येथील श्री विष्णुयाग अनुष्ठान : ही श्रींची इच्छा

गजानन हरी सायनेकर

।। श्री पांडुरंगो विजयते ।।

**समस्त ब्रह्मवृंदांतर्फे** गेली एक्केचाळीस वर्षे विठ्ठलापूर-सांखळी गोवा येथे श्री विष्णुयाग अनुष्ठान पौष वद्य नवमी व दशमी या तिथींना अव्याहत चालू आहे. या वर्षी (१०-११ जानेवारी २०१८) रोजी साजरा होणारा हा बेचाळिसावा अनुष्ठान सोहळा आहे.

या अनुष्ठानाचे निमित्त झाले शृंगेरी पीठाचे जगद्गुरू श्रीमद् शंकराचार्य. श्रीमद् शंकराचार्यांनी १९७५ मध्ये सांखळी येथील श्री विठ्ठल मंदिरास भेट देण्याचे ठरविले. ही वार्ता सांखळीतील ब्रह्मवृंदांस समजली. आपल्या गावी येणाऱ्या महान विभूती श्रीमद् शंकराचार्य यांचा सन्मान, आदरातिथ्य करावे, असे श्री विठ्ठल मंदिरात ब्रह्मवृंदांच्या झालेल्या बैठकीत सर्वानुमते ठरले व पाद्यपूजेचा कार्यक्रम ठरविण्यात आला. कार्यक्रम यशस्वी व्हावा, या उद्देशाने समिती स्थापन करण्यात आली. निधी गोळा करण्यास सुरुवात झाली व या निधीतून पाद्यपूजेचा कार्यक्रम सर्वांच्या सहकार्याने यशस्वी झाला. परंतु जमविलेला निधी शिल्लक राहिला व त्याचे काय करावे, असा विचार पुढे आला. सर्वानुमते या निधीतून श्री विठ्ठलचरणी जनकल्याण व शांतीसाठी धर्मकृत्य करावे. असे ठरले. विठ्ठलापूरस्थित ज्येष्ठ व जाणकार ब्रह्मवृंदांनी पवमान स्वाहाकार करावा असे सुचविले व त्यास मान्यता मिळाली. अनुष्ठानास श्रीकृपेने प्रेरणा मिळाली. पहिले अनुष्ठान १९७६ मध्ये पौष वद्य पंचमी व षष्ठी या तिथींना पार पडले.

या सदर अनुष्ठानास जमा झालेला निधी खर्च झालाच नाही, उलट मोठ्या प्रमाणात निधी जमला. याचे प्रमुख कारण म्हणजे उपस्थित जनसमुदायाकडून यथाशक्ती देणगी व ब्रह्मवृंदांनी स्वीकारलेली दक्षिणा श्रीचरणी अर्पण केली. ही श्रींची इच्छा असा ईश्वरी संकेत मानून, पुढील वर्षीही अशाच प्रकारचे अनुष्ठान करण्याचे ठरले व ते चालू राहिले. काही वर्षे हे अनुष्ठान पौष वद्य पंचमी व षष्ठी या तिथीला झाले. परंतु कै. वे. मू. कमलाकरशास्त्री पित्रे यांनी हा कार्यक्रम नवमी व दशमी या तिथींना व्हावा, असे सुचविले. याचे प्रमुख कारण असे की श्री विठ्ठल मंदिरात दशमी तिथींना पालखी असते अनुष्ठानाची सांगता पालखी उत्सवाने होईल, हा विचार सर्वांना पटला व नवमी-दशमी तिथी नक्की झाली.

अनुष्ठान यशस्वी व्हावे म्हणून सुरुवातीला सत्कार्योत्तेजक मंडळ नावाची समिती स्थापन करण्यात आली काही वर्षांनी हे नाव बदलून 'श्री विष्णुयाग अनुष्ठान मंडळ' असे करण्यात आले. सर्व व्यवहार या मंडळामार्फत चालतात. उत्कृष्ट व्यवस्थापन, शिस्त व चोख व्यवहार ही या मंडळाची वैशिष्ट्ये. सध्या या मंडळाची जबाबदारी विठ्ठलापूरस्थित ब्रह्मवृंद उत्तम प्रकारे सांभाळतात. श्री विठ्ठलकृपेने मंडळास आतापर्यन्त निःस्वार्थी, मनमिळाऊ, कर्तृत्ववान पदधिकारी लाभले. दर तीन वर्षांनी सर्वसाधरण सभेत नवी समिती निवडली जाते.

श्री विष्णुयाग अनुष्ठान रौप्यमहोत्सव कार्यक्रम (१४ ते १९ जानेवारी २००१) मोठ्या उत्साहाने व भरगच्च कार्यक्रमांनिशी श्री विठ्ठल मंदिराच्या प्रांगणात पार पडला. या निमित्ताने रौप्यमहोत्सव विशेषांक प्रसिद्ध करण्यात आला.

या विशेषांकात विद्वान व जाणकार व्यक्तींचे लेख प्रसिद्ध झाले. नंतर साधारणतः २००२-२००३ दरम्यान हा कार्यक्रम विठ्ठलापूरच्या ब्रह्मवृंदांच्या निवासस्थानी संपन्न होत आहे. सध्या श्री. अभय गं. किंजवडेकर यांच्या निवसस्थानी हा कार्यक्रम होत आहे न्याहारी, महाप्रसाद इ. व्यवस्था श्री. दत्ताराम (उल्हास) गो. बाक्रे यांच्या निवासस्थानी होत आहे. श्री विठ्ठलकृपेने भाविक व श्रद्धाळू व्यक्ती या अनुष्ठानास न्याहारी, महाप्रसाद इ. सेवा म्हणून प्रायोजित करतात. दोन दिवसांच्या या कार्यक्रमात पहिल्या दिवशी श्री विठ्ठल पंचायतन मूर्तींवर पवमान पंचसूक्ताचा जपाभिषेक; दुसऱ्या दिवशी हवन, पूर्णाहूती, आरती, प्रार्थना; रोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम, आरती, मंत्रपुष्प.


शेवटी श्री विष्णुयाग अनुष्ठान मंडळास व समस्त विठ्ठलापूरस्थित ब्रह्मवृंदांस ही ईश्वरी कार्य याहीपेक्षा उत्साहाने पुढे नेण्यास श्री पांडुरंग त्यांना शक्ती, बुद्धी व आयुरारोग्य प्रदान करो, ही श्रीचरणी प्रार्थना.

**गजानन हरी सायनेकर**
डिचोली-गोवा.
मो.: ०९९२३७९९६९७

# 'अनमोल' देह

नुकतीच एक गमतीशीर बातमी वाचली. अमेरिकेमध्ये दर वर्षी एक कोटी पन्नास लाख (१,५०,००,०००) इतक्या दातांच्या रूट कॅनालच्या केसेस होतात. प्रत्येक रूट कॅनालचा सरासरी खर्च ८०० डॉलर्स इतका असतो. म्हणजे दर वर्षी अमेरिकेमध्ये १२ अब्ज डॉलर्स (१२,००,००,००,०००) इतका खर्च केवळ दातांच्या रूट कॅनालवर होतो. या सरासरी अंदाजित संख्या जरी धरल्या, तरी १० अब्ज डॉलर तरी केवळ दातांच्या इलाजासाठी खर्च होतात, असं नक्कीच म्हणता येईल. मी चक्रावलोच. रूट कॅनालसारख्या साधारणतः सोप्या समजल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियेचा जर हा खर्च असेल, तर बाकीच्या अवयवांच्या त्या मानाने अधिक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांचा खर्च तर माझ्या विचार करण्यापलीकडे गेला. म्हणजे अगदी पायांच्या नखापासून ते डोक्याच्या केसांपर्यंत प्रत्येक अवयवाची किंमत काढायची ठरवली, तर एक मनुष्यदेह किती किमतीचा असेल? माझं कुतूहल अधिक चाळवलं गेलं आणि जरा अधिक माहितीसाठी गुगल महाराजांना विचारलं की– केसांचं ट्रान्सप्लांट होतं, त्या वेळी एक केस ट्रान्सप्लांट करण्याचा काय खर्च आहे? उत्तर आलं– एका केसाला ३ डॉलर ते ९ डॉलर. त्याची सरासरी धरली, तर उत्तर ६ डॉलर. सामान्यपणे माणसाच्या डोक्यावर सरासरी दीड लाख (१,५०,०००) इतके केस असतात. म्हणजे याचाच अर्थ, माणसाच्या डोक्यावरच्या केसांचीच किंमत साधारणपणे ९ लाख डॉलर इतकी आहे. मी अधिकच चक्रावलो. या संख्या डोळ्यांसमोर आल्या आणि एकंदर मनुष्यदेहाची किंमत किती येईल, हे गणितही माझ्याच्याने पूर्ण होईना.

विचार करताना शरीराची सगळी आकृती समोर उभी राहिली. हात, पाय,



त्यांची बोटं, डोळे, कान, नाक, श्वासनलिका, अन्ननलिका, फुफ्फुस, हाडांचा सापळा, हृदय, यकृत, प्लीहा, लहान आतडं, मोठं आतडं, जननेंद्रिय, रक्त, इतर एन्झाइम्स आणि सर्वांत महत्वाचा मेंदू... काय चमत्कार आहे शरीर म्हणजे! मी एका ठिकाणी वाचलं होतं की– माणसाच्या शरीरात चालणाऱ्या ज्या सगळ्या व्यवस्था आहेत, त्यांची शरीरात चालणाऱ्या अचूकतेने प्रतिकृती करायची म्हटली तर कमीत कमी पाच एकर इतका मोठा आणि अतिशय क्लिष्ट यंत्रांनी बनलेला कारखाना निर्माण करावा लागेल. हेच काम निसर्गाने म्हणा, ईश्वराने म्हणा– सहा फूट लांब दीड फूट रुंद अशा मानवी देहात करून दाखवलं आहे. एका तज्ज्ञाने सांगितलेलं मी ऐकलं आहे की, शरीरातील अवयव हे साधारणपणे १५० ते २०० वर्षां पर्यंतसुद्धा सक्षमपणे काम करू शकतात आणि म्हणूनच एका शरीरातून दान केलेले अवयव दुसऱ्या शरीरात पुन्हा आयुष्यभर व्यवस्थित काम करतात. माणसाच्या देहाची ही शक्ती आहे, हा चमत्कारच नाही का? चमत्कार म्हणजे वेगळा अजून काय असू शकतो?

मनात आलं, फुकट मिळाला म्हणून कसा देह वापरतो आपण? देहाचा प्रत्येक अवयव संपूर्ण आयुष्यभर माणसाने केलेल्या अत्याचाराचा भडिमार सहन करत–करत शक्य होईल तितकी साथ देण्याचा प्रयत्न करतो आणि माणूस पायपोस असल्यासारखं देहाला का वागवतो? काहीही खातो, कधीही खातो, काहीही पितो, कधीही पितो, कधीही झोपतो, कधीही उठतो– व्यसनं करतो आणि काय काय! का असं? ज्या परमेश्वराने हा चमत्कार प्रत्येक मनुष्याला बहाल केला आहे, त्याची किंमत आहे का आपल्याला? आपण ३००० रुपयांचा साधा चष्मा... त्याची किती काळजी घेतो, त्याला केसमध्ये नीट ठेवतो; पण तशी डोळ्यांची काळजी घेतो का?

कॉन्टॅक्ट लेन्सेस अगदी काळजीपूर्वक दररोज रात्री सोल्युशनमध्ये बुडवून ठेवतो; पण डोळ्यांसाठी दिवसातून एकदा तरी नेत्रस्नान करतो का? जसं डोळ्याचं तसंच इतर अवयवांचं. आपल्या संस्कृतीत अष्टांगयोग आणि आयुर्वेद हे दोन अमृतकुंभ या देह नावाच्या चमत्काराचा सांभाळ करण्यासाठीच दिले आहेत. शरीरात बिघाड होऊच नये म्हणून अष्टांगयोग आणि काही कारणांनी झालाच तर शरीर पूर्ववत् करण्यासाठी आयुर्वेद. या दोघांचा किती सुंदर मेळ आपल्या संस्कृतीत घालून दिलेला आहे! किती भाग्यवान आहोत आपण की, आयुष्यातील प्रत्येक गोष्ट अनुभवण्यासाठी शरीर नावाची सुंदर भेट आपल्याला ईश्वराने दिलेली आहे. त्याचा निदान योग्य तो सांभाळ करण्याची जबाबदारी आपली नाही का?

मी लहानपणी एक प्रार्थना शिकलो की, जी मी दररोज रात्री निजण्याअगोदर म्हणतो. ती प्रार्थना अशी–

डोळ्यांनी बघतो, ध्वनी परिसतो
कानी, पदी चालतो ।
जिव्हेने रस चाखतो, मधुरसे वाचे
आम्ही बोलतो।
हाताने बहुसाळ काम करितो,
विश्रांतीही घ्यावया ।
घेतो झोप सुखे, फिरोन उठतो, ही
ईश्वराची दया ।।

मी ही प्रार्थना हात जोडून म्हणतो. पण मला वाटतं, या प्रार्थनेचं अधिक महत्त्व पटण्यासाठी आणि मनावर याचा गांभीर्याने परिणाम होण्यासाठी मी ही प्रार्थना खिशात हात घालून म्हटली पाहिजे. तरच दररोज आठवण राहील की, या देहाची एकूण कॅपिटल व्हॅल्यू किती! किती अमूल्य आहे हा देह! आणि खिशात हात घालून प्रार्थना केल्यामुळे याचीही आठवण राहील की– माझ्या शरीराची मीच जर काळजी नाही घेतली, तर त्याच खिशातून एकेक केस परत मिळवण्यासाठी सहा डॉलर बाहेर काढायला लागतील कधी तरी...

**–श्री. शिरीष कुलकर्णी**

# कोण?

कोण फिरवतो कालचक्र हे
दिवसामागून रात्र निरंतर?
कोण मोजतो खेळ संपता
आयुष्याचे अचूक अंतर?

कोण निर्मितो श्वासांसाठी
करुणेचा हा अमृतवारा?
कोण फुलवतो आठवणींनी
रंध्रारंध्रातून पिसारा?

कोण राखतो काळजावरी
शरीराचा हा खडा पहारा?
कोण शिकवतो कसा धरावा
स्वप्नांमधला मुठीत पारा?

कोण ठरवतो पाऊस येथे
कधी दडावा, कधी पडावा?
कोण सांगतो कधी कसा अन्,
कोणावरती जीव जडावा?

कोण पढवतो जगता जगता
नावडता, तरी हात धरावा?
कोण रोखतो अदम्य इच्छा
हृदयामधला श्वास सरावा?

कोण बोलतो निमूट रात्री
शरीराशी शरीराची भाषा?
कोण रुजवतो गर्भामध्ये
जगण्याची ही नाजूक आशा?

कोण पंपतो श्वासांमधूनी
रक्तामधल्या प्रेमळ लहरी?
कोण साठवी गंध कळ्यांतून
दवभरल्या या गुलाबप्रहरी?

रात्रीच्या या रोज ललाटी
चंद्रटिळा हा कोण रेखितो?
वसुंधरेला न्हाता न्हाता
सूर्याआधी कोण देखितो?

आई नसता जगात जरीही
घास भरवतो कोण तरीही?
पहाट स्वर्णिल कोण दावितो
कटू स्मृतींची रात्र जरीही?

रचतो कैसा कोण नभातुन
थेंबांमधली भिजली गाणी?
मातीच्या या ओठांमधूनी
कोण बोलतो हिरवी वाणी?

कोहं कोहंऽ कोण वदवितो
प्रश्न चिरंतन, बाकी नश्वर?
कोण लुब्ध जो या सृष्टीवर
नतमस्तक हे उत्तर ईश्वर?

....बा. भ. बोरकर

# चित्तशुद्धीकरिता बारा राशी आणि त्यांचे काही दुर्मिळ उपयुक्त मंत्र

'इथे रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात साधं देवाचं नाव घ्यायलासुद्धा वेळ मिळत नाही, तिथे अनुष्ठानं करायला वेळ कुठून काढू?' हा तक्रारवजा प्रश्न हल्ली रोजचा झाल्यासारखा आहे.

आयुष्य इतकं गतिमान झालंय की, नाही वेळ मिळत देवासाठी. म्हणून मग सुपरफास्ट लाईफमध्ये उपयोगी पडतील, असे हे काही इन्स्टंट मंत्र.

जी आपली रास (चंद्ररास) असेल, त्या राशीचा मंत्र हव्या तितक्या वेळेस जपू शकता. १०८ पासून पुढे आपल्या वेळेच्या उपलब्धतेनुसार जप करू शकता. अगदीच वेळ नसेल, तर एक मंत्र किमान ११ वेळा तरी जपावा. तेवढंच त्या राशीच्या देवतेला बरं वाटेल.

**Mesha** (Aries) : Aum Gam Ganapataye Namaha | मेष : ॐ गं गणपतये नमः ।

**Vrishabha** / Vrushabha (Taurus) : Aum Shree Namaha | वृषभ : ॐ श्री नमः।


**Mithuna** (Gemini) : Paandurang Haree, Vaasudev Harihi | मिथुन : पांडुरंग हरी वासुदेव हरि।

**Karka** (Cancer) : Aum Namaha Shivaya | कर्क : ॐ नमः शिवाय ।

**Simha** (Leo) : Shree Raam Jay Raam Jay Jay Raam | सिंह : श्रीराम जय राम जय जय राम ।

**Kanya** (Virgo) : KrushNaay Namaha | कन्या : कृष्णाय नमः ।

Tula (Libra) : Aum Namo Bhagavate Vaasudevaay | तूळ : ॐ नमो भगवते वासुदेवाय।




**Vrishchika** / Vrushchika (Scorpio) : Aum Shree Namaha | (Same as Vrishabha above) वृश्चिक : ॐ श्री नमः।

**Dhanu** (Sagittarius) : Digambaraa Digambaraa Shripaad Vallabha Digambaraa | धनु : दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।

**Makar** (Capricorn) : Maarute Rudraay Namaha | मकर : मारुते रुद्राय नमः ।


**Kumbha** (Aquarius) : Shivarudraay Namaha | कुंभ : शिव रुद्राय नमः ।

**Meena** (Pisces) : Soham Datta | मीन : सोहं दत्त ।

**संकलन - श्री. रामचंद्र कोऱ्हाळकर**
**ज्योतिष विशारद**

# मंदिराचे अंतरंग - श्री कर्णेश्वर मंदिर

कोकणची भूमी ही प्राचीन आख्यायिका आणि ऐतिहासिक घटनांची साक्षीदार आहे. त्यात कोकणातील अनेक प्राचीन मंदिरे म्हणजे वास्तुकलेचे उत्तम नमुने. संगमेश्वर तालुक्यातून मुंबई-गोवा महामार्ग जातो. येथे कसबा नावाचे गाव आहे. या भागाला ऐतिहासिक महत्त्व आहे. औरंगजेबाच्या सरदाराने छत्रपती संभाजीराजांना १६८२ मध्ये याच कसबा गावात अटक करून पुढे पुण्यातील तुळापूर येथे नेऊन त्यांची क्रूर हत्या केली. कसबा गावाची आणखी एक ओळख म्हणजे, येथील पांडवकालीन श्री कर्णेश्वराचे हेमाडपंती मंदिर. कसबा-संगमेश्वर या गावांना फार पूर्वी 'रामक्षेत्र' असंही ओळखलं जात असे. मुंबई-गोवा महामार्गावर शास्त्री पूल ओलांडल्यावर डावीकडे कसबा नावाच्या या गावात हे कर्णेश्वराचे मंदिर आहे. संगमेश्वरपासून दोन किलोमीटर अंतरावर अत्यंत रम्य



परिसरात असलेले हे मंदिर स्थापत्यकलेचा अद्भुत आविष्कार आहे. भल्या मोठ्या दगडांना आकार देत अप्रतिम शिल्पकला साकारून हे मंदिर उभारण्यात आले आहे.

संभाजीमहाराजांचा अर्धपुतळा कसबा गावात शिरल्या शिरल्या दिसतो. याच पुतळ्याच्या मागे जाणारा रस्ता आपल्याला कर्णेश्वर मंदिरापर्यंत घेऊन जातो. जेमतेम एक गाडीच जाऊ शकेल एवढा चिंचोळा रस्ता आहे. मोठ्या आकारातील कर्णेश्वराचे अत्यंत सुंदर असे हे मंदिर प्रथमदर्शनीच मन मोहून टाकते. मंदिरात पोहोचल्यावर डाव्या बाजूला छोटेसे सूर्यमंदिर दिसले. सूर्यनारायणाच्या मागील बाजूस बारा राशी कोरलेल्या आहेत.

**मंदिर एक, आख्यायिका अनेक :-** कर्णेश्वर मंदिराबाबत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. हे मंदिर पांडवांनी एका रात्रीत बांधले असे कोणी सांगतात. तर पांडवांनी आपला मोठा भाऊ कर्णाची आठवण राहावी म्हणून हे मंदिर बांधले असे सांगतात. भगवान परशुराम यांनी हे मंदिर बांधल्याची सुद्धा आख्यायिका आहे. वनवासात असताना पांडव

परशुरामांकडे धनुर्विद्या शिकले. परशरामांनी सहावा मोठा भाऊ कर्णाबद्दल सांगितले; तेव्हा पांडवांनी कर्णेश्वर मंदिर बांधले, असेही सांगितले जाते. या मंदिराच्या वास्तुरचनेवरून सातव्या शतकातील चालुक्य घराण्यातील कर्ण नावाच्या राजाने हे मंदिर उभारले, असे इतिहासतज्ज्ञ सांगतात, बाकी आख्यायिका काहीही असतो. मंदिरावरील कलाकुसर पाहून मंदिर कोणी बांधले यापेक्षा ते कसे बांधले असेल याचा विचार करतानाच आश्चर्य वाटू लागते. कसबा गावात पूर्वी ३०० ते ४०० मंदिरे असल्याच्या नोंदी आहेत. सध्या यातील काही मोजकीच मंदिरे तग धरून आहेत.

**पालथे ताट :**

कर्णेश्वराचे मंदिर एका दगडातून कोरलेले भव्य देऊळ म्हणून प्रसिद्ध आहे. कर्णेश्वर म्हणजे महादेव. प्रत्येक प्राचीन मंदिराला काही ना काही आख्यायिका असते. अशीच एक आख्यायिका या मंदिराबाबत सांगितली जाते. पांडव वनवासात असताना त्यांनी कर्ण नावाच्या राजाच्या पणानुसार एका रात्रीत एका दगडातून हे देवालय कोरले. दमल्यावर ते जेवायला बसले असता, पहाटे कोंबडा आरवला. पहाट झाल्याने जेवायचे कसे, म्हणून ताटे पालथी टाकून उठले. या मंदिरात ५ दगडी पालथी ताटे (पराती) कोरलेल्या आहेत. या ताटांखाली गुप्त धन पुरले असल्याचे सांगितले जाते. पांडवांनी त्या काळातील लिपीत दोन ओळी लिहून ठेवल्या आहेत. या ओळींचा अर्थ समजू शकल्यास ही पालथी पाने सुलटी होतील आणि त्या मनुष्याला ताटाखाली लपवलेले धन मिळेल, असे म्हणतात. अंदाजे चार फूट लांबीची ही दगडात कोरलेली पाच ताटे आहेत. मंदिराला तीन दरवाजे असून, प्रत्येक दारात पालथे ताट आहे. एक ताट मंदिराच्या मध्यभागी असून, पांडवाच्या पाच ताटांसोबत सहावे ताट कर्णाचे म्हणून ओळखले जाते आणि त्यावर शंकराची पिंडी आहे. त्यावर मोठे शिवलिंग आहे. गाभाऱ्यात न बसता-देखील गाभाऱ्याबाहेर बसून पिंड संपूर्ण दिसते. त्यामुळे ध्यानधारणा करण्यासाठी बाहेरदेखील बसता येते.

मंदिराला प्रमुख तीन दरवाजे आहेत. पूर्व दिशेला असलेल्या मंदिराच्या प्रवेशद्वारावर 'शिवपंचायत' आहे. त्याच्या डाव्या बाजूस नरकासुर आणि उजव्या बाजूस किती सुरांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. या दोन राक्षसांचे शंकराशी युद्ध झाले होते. त्या युद्धात पराजय झाल्यावर आपल्या पायाशी स्थान मिळावे, असा या दोन राक्षसांनी शंकराकडे वर मागितला. तेव्हा शंकराने प्रसन्न होऊन त्यांना मंदिराच्या बाहेरील दरवाज्याच्या चौकटीत स्थान दिले. यांना पाय लावून आत येण्याची प्रथा आहे. प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूस सुंदर असे दशावताराचे शिल्प कोरण्यात आले आहे. श्री विष्णूच्या दहा अवतारांपैकी मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, राम, कृष्ण, परशुराम, बुद्ध, कल्की आदींची शिल्पे कोरलेली आहेत. संपूर्ण मंदिर मगरीच्या पाठीवर उभे असल्याचे मगरीच्या शिल्पावरून वाटते. शक्यतो महादेवाच्य ामंदिरात गोमुखातून तीर्थ बाहेर येताना दिसते, मात्र या ठिकाणी मगरीच्या शिल्पातून ही सोय केलेली आहे. कर्णेश्वर मंदिराबाहेर गणेशाची छोटी मूर्ती आहे. ही मूर्ती पाहिल्यावर वाईतील महागणपतीच्या मूर्तीची आठवण होते.

दरवाज्याजवळ पांडवांचे ताट म्हणून ओळखले जाणारे पालथे ताट आहे. त्यावर बकुळीचे फूल कोरलेले आहे. ताटाच्या बाजूस पांडवांची आसने दिसतात. साधारणपणे चार फूट उंच असलेली ही आसने आहेत. मंदिराच्या मुख्य दरवाज्याजवळ नंदीमंडप आणि दोन अष्टभैरव द्वारपाल आहेत. तिथून पुढे मंडप, मंदिराच्या छतावरची कोरीव शिल्पे, सिंह, मुख्य छतातून झुंबराप्रमाणे दिसणारे कमळाकृती दगडी झुंबर, सभामंडपातील शिलालेख, शेषशायी विष्णूचे शिल्प कोरून ठेवलेली आहेत. मंडपात प्रवेश करताच नंदी आणि त्यानंतर शंकराची मूर्ती दिसते. मंडपाला एकूण चार खांब आहेत. विशेष म्हणजे, हे चारही खांब एकसमान आहेत. दक्षिण दरवाज्याच्या मागे खांबावर शिलालेख आहे. मुख्य मंडपाच्या डाव्या हाताला श्री महालक्ष्मीची मूर्ती आणि उजव्या बाजूला शेषशायी विष्णूची मूर्ती आहे. **येथील भगवान विष्णूचे शेषशायी शिल्प व दगडी झुंबर हे पाहण्यासारखे आहे.**

मंदिरातील देव, दानव, नृत्यांगना, किन्नर, यक्ष-यक्षिणी आदी मूर्तींवर कोरीव काम केलेले आहे. मंदिराच्या प्रत्येक प्रवेशद्वारावरील खांब अलंकृत सुंदर नक्षीदार कोरलेले आहेत. कर्णेश्वर मंदिराचा कोपरान्‌कोपरा दगडी शिल्पकलाकुसरीने कोरलेला आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूसही उत्तम कोरीवकाम केले असून शिल्पकलेचे अप्रतिम दर्शन मंदिर न्याहाळताना होते. मंदिराच्या मागील बाजूने एका ठिकाणाहून पाहिल्यास मंदिराच्या कळसाची रचना गोलाकार आकारात केलेली दिसते. मंदिराच्या बाहेरील बाजूस ॐ कार आकारातील गणेश व पार्वतीची नृत्य करतानाच्या मुद्रेतील छान मूर्ती आहे. मंदिर आवारात उत्तर दिशेला सूर्यमूर्ती

आणि समोरच्या बाजूस गणेशाचे मंदिर आहे. मंदिरापासून काही अंतरावरच अलकनंदा, वरुणा आणि शास्त्री या नद्यांचा संगम पाहायला मिळतो. या नद्यांच्या संगमामुळेच 'संगमेश्वर' हे नाव प्रचलित झाले. मंदिराबाहेर गणपती, पार्वती, महिषासुरमर्दिनी, नृसिंह, बलराम, हनुमान या देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. तसेच मंदिरातील प्रत्येक खांबाला एकाच साच्यामधून काढल्याप्रमाणे नक्षीकाम आहे. मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे, बांधकामामध्ये कोणत्याही धातूचा वापर केलेला नाही.

कोकणातील अनेक मंदिरे म्हणजे वास्तुकलेचे उत्तम नमुने. काळाच्या ओघात मोठमोठ्या संस्कृती नष्ट झाल्या. श्री केदारनाथला नुकताच महाप्रलय झाला. सुदैवाने मंदिर वाचले, पण प्राणहानी प्रचंड झाली. आज जी काही प्राचीन मंदिरे महाराष्ट्रात आहेत, ती अप्रतिम कलाकृतींनी साकारलेली आहेत. प्राचीन कलाकृतींकडे पुरातत्त्व खात्याने त्वरीत लक्ष देणे गरजेचे आहे. कोकणात अनेक ऐतिहासिक ठेवे आहेत. खरे तर हे बहुमूल्य ठेवे जपून ठेवायला हवेत. त्यामुळे हा प्राचीन वास्तुकलेचा खजिना टिकून राहील. कोकण सहलीत कर्णेश्वराचं मंदिर आवर्जून पाहायला हवे. मंदिराभोवती असलेली हिरवीगार दाट झाडी, डोंगर, नद्या, शेती यांनी हा परिसर बहरलेला आहे. महाशिवरात्रीला कर्णेश्वर मंदिरात मोठा उत्सव होतो.

**ऐतिहासिक वारसा असलेले कसबा गाव:** कसबा गावातच सरदेसाईंच्या वाड्यात संभाजीमहाराज आलेले असताना शत्रूला खबर मिळाली. याच ठिकाणी संभाजीमहाराजांना कैद करण्यात आले. महाराष्ट्राचा इतिहास ज्या जागेवर एका क्षणात बदलला त्या कसब्यातील सरदेसाईंचा वाडा आज जमीनदोस्त झालेला आहे. वाड्याच्या काहीच खाणाखुणा शिल्लक असल्याचे दिसते. काय दुर्दैवी योगायोग म्हणावा! अलकनंदा, वरुणा आणि शास्त्री या नद्यांच्या संगमावर असलेले कसबा हे गाव. त्यावरून या भागाला संगमेश्वर म्हणू लागले. छत्रपती संभाजीमहाराजांना येथे पकडण्यात आले. तिथून पुढे पुण्याजवळील तुळापूरजवळील भीमा, भामा, इंद्रायणी या नद्यांच्या त्रिवेणी संगमाजवळ त्यांचा क्रूर वध करण्यात आला. दोन्हीही ठिकाणी तीन नद्यांचा संगम आहे.

**आणखी काय पाहाल :**

मुंबई-गोवा महामार्गालागूनच असलेल्या अरवली, राजावाडी आणि गोळवली येथील गरम पाण्याची कुंडे.

मार्लेश्वराचे प्रसिद्ध देऊळ येथून सुमारे ३५ कि. मी. अंतरावर आहे.

संभाजीमहाराजांची सासूरवाडी व मुख्य ठाणे असलेले शृंगारपूर हेदेखील संगमेश्वरच्या जवळ आहे.

**कर्णेश्वर देवस्थानाकडे जाण्याचा रस्ता :**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग (एन. एच. १७) वर चिपळूणहून संगमेश्वरकडे येताना संगमेश्वर एस. टी. स्थानकाच्या २ कि.मी. अलीकडे शास्त्री पूल लागतो. पूल ओलांडल्यावर लगेचच डावीकडे वळून साधारणपणे दीड किलोमीटर अंतरावर कसबा गाव लागते. तिथे छत्रपती संभाजीमहाराजांचा अर्ध पुतळा आहे. त्या पुतळ्यामागे काही अंतरावर हे मंदिर आहे. मंदिरापर्यंत चांगला गाडी रस्ता आहे.

**कुंभार्ली घाट** :- चिपळूण-कराड-सातारा-पुणे-बंगलोर मार्गाला कुंभार्ली घाट जोडतो. जागतिक वारसा-स्थळांमध्ये नोंद झालेल्या पश्चिम घाटातील एक प्रमुख घाट म्हणजे कुंभार्ली घाट. कोकण व घाटांना जोडणाऱ्या या कुंभार्ली घाटात थंडगार पण आल्हाददायक वारे, धो-धो कोसळणारे धबधबे व निसर्गरम्य परिसर असे ठिकाण आहे. जवळच असणाऱ्या कोयना अभयारण्यामुळे या ठिकाणी प्रचंड झाडी आहे. कोयनानगर पोपळी जलविद्युत प्रकल्पामुळे हा परिसर नावारूपाला आलेला आहे. महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात वीज उपलब्ध करून देण्याचे काम येथे केले जाते. गर्द झाडीने हा भाग वेढलेला आहे.

प्राचीन काळी मौर्य व मुघलांच्या पूर्वीपासून प्रमुख व्यापारी मार्ग म्हणून प्रसिद्ध असलेल्या या कुंभार्ली घाटातून देशावरती येण्यासाठी या रस्त्याचा वापर केला जाई. थंड हवेची ठिकाणे इंग्रजांना आवडायची यासाठी त्यांनी माथेरान, महाबळेश्वर, आंबोली अशा घाटांतून जाण्यासाठी मार्ग शोधून काढले. हा घाटरस्ता सोनू नावाच्या धनगराच्या मदतीने इंग्रजांनी शोधून काढला. त्यानंतर त्याला मारण्यात आले. त्याची समाधी या ठिकाणी आपणास दिसते. एका वळणावर हे स्थान आहे. प्रत्येक चालक तिथे नमस्कार करून पुढे जातो. प्रत्येक घाटामध्ये मंदिरे आहेत.

संगमेश्वर येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेचा प्रबंधक (मॅनेजर) म्हणून काम करत असताना मला ह्या परिसरात भटकण्याचा बराच योग आला पर्यटकांनी आवर्जून पहावे असे हे ठिकाण आहे.

- श्री. श्रीगजानन गुर्जर
मो. : ९९७०१ ७४८१८

# भक्त


'भक्त' या शब्दात मोठी गंमत आहे. मुळात भक्त म्हणजे काय? तर, जो विभक्त नाही, तो. विभक्त म्हणजे डिपार्टेड.

तर, भक्त याचा अर्थ 'एकरूप झालेला' असा होतो. अर्थात भक्ती म्हणजे एकरूप होण्याची प्रक्रिया. एकरूप होण्याकरता जवळ येण्याची गरज असते किंवा जवळ येणं ही एकरूप होण्याची पहिली पायरी समजू. अर्थात, हे जवळ येणं म्हणजे काय? तर, अंतर नाहीसं करणं. हे अंतर दोन प्रकारचं असतं. एक- जे डोळ्यांना दिसतं, ज्याला फिजिकल डिस्टन्स असं म्हणतात.

देवळासमोरच्या रांगेतला शेवटच्या टोकाचा माणूस आणि गाभाऱ्यातली मूर्ती यांच्यात अंतर आहे. रांग संपली, तो गाभाऱ्यात पोहोचला. फिजिकल डिस्टन्स कमी झालं. पण अतंरातल अंतर – ज्याला 'इनर स्पेस' म्हणतात, त्याचं काय? रांगेच्या शेवटच्या टोकाला येऊन तो उभा राहिला, तेव्हा त्याचं साध्य होतं- गाभाऱ्यात पोचण्याचं, देवाला पाहण्याचं. तो त्या टोकाला उभा होता, पण मनाने मात्र गाभाऱ्यातच होता. मग रांगेत रमला. तिथल्या लोकांशी रुळला. राजकारणावर चर्चा केली. रांगेतला एक जण त्याचा व्यवसायबंधू निघाला, एक महत्त्वाचं डील ठरलं. तासाभरात जर बाहेर पडलो, तर आजच हे डील साध्य होईल. आता तो घड्याळाकडे पाहतो. गाभाऱ्यातल्या देवाला विनवतो, रांग लवकर संपू दे! लवकर डील होऊ दे! पाच किलो पेढे देईन!....

साध्य बदललं!!! मघाशी त्याचं साध्य होतं- देव; आता साध्य आहे- डील! देव हे फक्त साधन आहे. म्हणजे शरीराने जेव्हा तो गाभाऱ्यात पोहोचलाय, तेव्हा मनाने खरं तर तिथून कित्येक किलोमीटर दूर असलेल्या त्या डीलच्या ठिकाणी पोहोचलाय. भेट झाली- पण भक्त आणि भगवंताची नाही, कारण भक्त त्यापूर्वीच विभक्त झाला...

प्रेम आणि भक्ती यातलं हेच साम्य आहे. दोन्हीचं अंतिम रूप हे विरघळून जाणं आहे. मीपण टाकल्याशिवाय विरघळता येत नाही. मला काय हवंय हे सांगण्यापेक्षा, तुला काय हवंय याचा विचार म्हणजे विरघळून जाणं! यात मी, माझं, मला राहतच नाही. इथेच प्रेम आणि भक्ती एक होते. मीरा कृष्णमय होऊन गेली. मीरेचं अस्तित्वच राहिलं नाही. ते खरे समर्पण होतं. पण म्हणून आज मीराबाई म्हणून डोळे मिटले, तर कृष्णाचं रूप डोळ्यांसमोर येतं. भक्तीचा अंतिम चरण. जवळ येण्याचं अंतिम रूप म्हणजे एकरूप होणं. अशी ही- तुका म्हणे 'भक्ती सुखरूप आदिअंती।'



# ब्रह्मराक्षस

कुळकर्ण्यांचा जुना वाडा आणि तिथला पिंपळ यापासून लोक चार हात दूरच असत. रात्री तर सोडाच, पण दिवसाही कोणी तिकडे जात नसे. त्या पिंपळावर ब्रह्मराक्षस राहतो, हे सर्व गावास माहिती होते. त्याला पाहणारी पिढी आता म्हातारी होती किंवा मृत झालेली होती, परंतु त्या ब्रह्मराक्षसाचा प्रचंड धाक संपूर्ण गावावर होता.

लहानगा नानू आणि अप्पा यांना ब्रह्मराक्षस म्हणजे बागुलबुवा वाटायचा. त्यामुळे ते न घाबरता मुद्दाम त्या वाड्यात जात सगळा वाडा फिरून वर पिंपळावरही पाहत की, कुठे ब्रह्मराक्षस दिसतो का? त्यांना भीती वाटायचीच नाही. पुढे अप्पाने नानूबरोबर जाणे सोडले, पण नानू मात्र थांबला नाही !

एक दिवस नानूची तपश्चर्या फळाला आली. तो दिवस पौर्णिमेचा होता. नानू भर माध्यान्ह समयी वाड्यात पोहोचला. आत नेहमीप्रमाणे भटकून झाल्यावर तो पिंपळाजवळ आला. तिथे त्याच्याच वयाचा, अत्यंत तेजस्वी असा एक मुलगा बसलेला दिसला. नानूने त्याच्याशी मैत्री केली .

हळूहळू नानू व ब्रह्मराक्षसाची मैत्री घट्ट होत होती. दोघांत वेदांत, राजकारण, ज्योतिष यावर तासन् तास चर्चा चाले. कधी कधी दोघे कुस्ती खेळत, पण नानू नेहमी जिंकत असे. या जिंकण्याचे नानुला नेहेमी कोडे पडायचे की– ब्रह्मराक्षस तर कुस्ती कधीच हरत नाही, मग माझ्याशी कशी हरत असावा बरं? तो विचारतही असे, पण ब्रह्मराक्षस हसून टाळून देई!

नानू गडगंज श्रीमंत. लक्ष्मी घरी पाणी भरत होती. रूपानं देखण्या नानूला पत्नी अत्यंत रूपवान मिळाली होती. मुलंबाळं, गाडीघोडे सगळी सुखं पायाशी लोळण घेत होती. बरं सगळं कसं योग्य वयात घडत होत! संपूर्ण कुटुंबास वैद्याचे तोंड कधी पाहावे लागले नव्हते. बर सगळे दीर्घायू ! नानूचे खापर पणजोबा तर सव्वाशे वर्षांचं आरोग्यमय आयुष्य जगले होते ! सगळे दात शाबूत होते. ऐकणं तीक्ष्ण होतं. बारीक 'ऊ' चाललेली देखील डोळ्यांना दिसायची, जमिनीवरची!

ठणठणीत म्हातारपण भोगत नानूने शंभरी पार केली! ब्रह्मराक्षस आता नेहमी आनंदी असायचा आणि नानू आला की खुशीत असायचा! एक दिवस एकशे वीस वर्षांचं आयुष्य जगून नानूने समाधानाने शांततेत प्राण सोडले. मृत्यूच्या समयाला त्याला एकच प्रश्न सतावत होता की ब्रह्मराक्षस कुस्ती का हरत असावा माझ्या सोबत ?

मृत्यू झाला तसा नानूचा आत्मा ब्रह्मराक्षसाच्या जवळ गेला! ब्रह्मराक्षसाने मोठ्या खुशीने त्याचं स्वागत केलं. नानूने आपला प्रश्न विचारला. ''तू माझ्यासोबत कुस्ती का हरत होतास? मी असं ऐकलंय की, तू कुस्ती कधीच हरत नाहीसं मग हे कसं घडलं?

मंद स्मित करत ब्रह्मराक्षसानं उत्तर दिलं, नानू तू लहानपणापासून इथे येतो आहेस. तेव्हाही मी कुणाला घाबरत नाही' याचा अहंकार तुला होता. मग सगळं अगदी वेळेत मिळाल्याचा अहंकार, आरोग्याचा अहंकार... पैसा, सोनंनाणं या सर्वांचा अहंकार. वाडवडिलांचा अभिमान असणं आणि अहंकार असणं यात फरक असतो. पण तुला अहंकार होता! आताही तू उणंपुरं एकशेवीस वर्षांचं आयुष्य जगलास; पण या अहंकाराने तुला ईश्वराचं स्मरण न होता माझं स्मरण झालं कारण मी तुझ्याशी कुस्ती हरत असे! अरे वेड्या, मीही असाच अहंकारी होतो. तुझ्यासारखाच मलाही विद्येसह सर्व गोष्टींचा अहंकार होता. मग मृत्यूनंतर मला ब्रह्मराक्षस बनावं लागलं. त्या यमराजाने मला सांगितले की, जेव्हा कोणी तुझ्यासारखाच अहंकारी तुला मिळेल व त्याचा मृत्यू होईल, तेव्हा तू मुक्त होशील तो ब्रह्मराक्षस बनेल! तर ऐक– मी तुझ्यातील अहंकार जागा राहावा व तुला तुझ्या बळाचा अहंकार सतत जागावा म्हणून कुस्ती हरायचो! चल आता मी मुक्त झालो तूही कुणी अहंकारी शोध आणि तुझी मुक्तता करून घे. चल, येतो रे नानू!''

काय बोध घ्यायचा, तो घ्या!

**– सौ. मीना गाडगीळ**

# कॅलरी किंवा उष्मांक म्हणजे नेमकं काय?

कॅलरी किंवा उष्मांक म्हणजे नेमकं काय, हे अनेकांना माहीत नसतं म्हणून हा प्रपंच. कॅलरी किंवा उष्मांक म्हणजे ऊर्जामापन. बहुतेकांचा असा समज आहे की, कॅलरी हा शब्द खानपानाशी संबंधित आहे. खरं म्हणजे, ज्यात ऊर्जा आहे. त्यात कॅलरी असते. उदाहरण म्हणजे कोळसा. जशा कॅलरी अन्नात असतात तशा किंबहुना, लाखोपटींनी जास्त कॅलरी कोळशात असतात. पण म्हणून कोणी कोळसा खात नाही. एक ग्रॅम कोळशात ७००५ कॅलरी असतात.

आता आपण कॅलरी किंवा उष्मांक कसा मोजतात, ते पाहू या. कॅलरीचे मापन दोन प्रकारे करतात. कॅलरी किंवा किलोकॅलरी. एक कॅलरी म्हणजे एक ग्रॅम पाण्याला एक डिग्री तापमान वाढवायला लागणारी ऊर्जा. एक किलोकॅलरी म्हणजे १००० ग्रॅम पाण्याला एक डिग्री तापमान वाढवायला लागणारी ऊर्जा.

मनुष्याला जगण्यासाठी कॅलरीची अत्यंत आवश्यकता असते. या कॅलरी आपण अन्न व पेयामधून मिळवतो. जेवढ्या कॅलरीज शरीराला लागतात तेवढ्याच घेतल्या, तर अतिशय हेल्दी आयुष्य आपण जगू शकतो. कॅलरीज जेव्हा कमी-जास्त घेतल्या जातात, तेव्हा शारीरिक व्याधी निर्माण होतात. अन्नातील कॅलरीज खालीलप्रमाणे असतात-

१ ग्रॅम कार्बोहायड्रेट्समध्ये ४ कॅलरीज असतात. १ ग्रॅम प्रोटिनमध्ये ४ कॅलरीज असतात.१ ग्रॅम फॅटमध्ये ९ कॅलरीज असतात.

प्रत्येकाची ऊर्जेची जरुरी वेगवेगळी असते. ती खालील कारणांवर अवलंबून असते. आरोग्य, कामाची पद्धत, वजन, उंची, आकार, लिंग, हवामान. आपल्या ऊर्जेचे किंवा कॅलरीजचे मापन BMR वरून काढता येते. BMR म्हणजे बेझल मेटॅबोलिक रेट. BMR प्रत्येकाचा वेगवेगळा असतो. BMR खालीलप्रमाणे मोजता येतो.

पुरुषांसाठी :- ६६.५ + (१३.७५ × वजन कि.ग्रॅ.) + (५.००३ × उंची सें.मी.) - (६.७५५ × वय) = BMR. उदा. ५ फूट ६ इंच उंचीच्या ७५ किलो वजनाच्या ५० वर्षे वयाच्या पुरुषास रोज १६०० कॅलरीजची जरुरी असते.


स्त्रियांसाठी :- ५५.१ + (९.५६३ × वजन कि.ग्रॅ.) + (१.८५० × उंची सें.मी.) - (४.६७६ × वय) = BMR. उदा. ५ फूट २ इंच उंचीच्या ६५ किलो वजनाच्या ५० वर्षे वयाच्या स्त्रीस रोज ७०० कॅलरीजची जरुरी असते.

आता आपण बघू या BMR वरून आपल्याला रोज लागणाऱ्या कॅलरीज कशा मोजायच्या. मूलतः आपल्या कामाच्या पद्धतीवर हे अवलंबून असते.

काम किंवा व्यायाम न करणारी व्यक्ती (Sedentary lifestyle) BMR × १.२ = रोज लागणाऱ्या कॅलरीज.

थोडं काम किंवा व्यायाम करणारी व्यक्ती (Slightly active lifestyle) BMR × १.३७५ = रोज लागणाऱ्या कॅलरीज.

जास्त काम किंवा व्यायाम करणारी व्यक्ती (Moderately active



lifestyle) BMR × १.५५ = रोज लागणाऱ्या कॅलरीज.

खूप जास्त काम किंवा व्यायाम करणारी व्यक्ती (Active lifestyle) BMR × १.७२५ = रोज लागणाऱ्या कॅलरीज.

अतिजास्त काम किंवा व्यायाम करणारी व्यक्ती (Very active lifestyle) BMR × १.९० = रोज लागणाऱ्या कॅलरीज.

कधी किंवा कोणत्या वेळेला खाता, हे फार महत्त्वाचे आहे. व्यायाम झाल्यावर सकाळचा नाश्ता अतिशय महत्त्वाचा. साधारणतः सकाळच्या नाश्त्याला रोजच्या एकूण कॅलरीजपैकी ७०० कॅलरीज घ्याव्यात. त्यामुळे डायबेटिस, हृदयविकार, वजन वाढणे, कोलेस्टेरॉल वाढणे अशा गोष्टी होण्याची शक्यता कमी होते. दुपारच्या जेवणामध्ये नाश्त्यापेक्षा जास्त कॅलरीज नसाव्यात. सर्वांत कमी कॅलरीज रात्रीच्या जेवणात असाव्यात.

- डॉ.योगेश गुर्जर

मो. : ९८२२३ ००२४४

# खाद्यसंस्कृती

## पानावरच्या फेण्या

**कृती :–** तांदळाचं पीठ सकाळी भज्यांच्या पिठाइतकं घट्ट भिजवून ठेवावे. संध्याकाळी त्या पिठात जिरं, मीठ, हिरवी मिरची, बारीक वाटून घालावी. कोथिंबीर बारीक चिरून घालावी. कुकरमध्ये पाणी घालावे, कुकरमध्ये राहील एवढी चाळण ठेवावी. वर झाकण ताट ठेवावे. वाफ आल्यावर तयार असलेले पीठ पानावर पसरून, ते पान चाळणीवर ठेवावे व ताट झाकण ठेवावे. दुसऱ्या पानावर पीठ पसरून होईपर्यंत पहिली फेणी वाफवून तयार होते. (साधारण १ मिनिटात) गरमगरम फेण्यांचा दही व नारळाच्या दुधाबरोबर आस्वाद घ्यावा.

## मूगडाळ कचोरी

**सारण :** मूग डाळ ३ तास भिजवून भरड वाटून घ्या. पाणी न घालता वाटा. तेल तापवून मोहरी, हळद, हिंगाच्या फोडणीवर वाटलेली डाळ परतून घ्या. पाणी न घालता वाफेवर शिजवा. खमंग व कोरडे झाले की त्यात लाल तिखट, चवीला साखर, धने-जिरे पूड, बडीशोप पूड, आमचूर व शेवटी मीठ घाला.

**आवरण–** २ वाट्या मैदा, तुपाचे मोहन अर्धी वाटी, मीठ, १ चिमूट सोडा, पाणी. मैदा भिजवून अर्धा तास ठेवा. गोळा घट्ट नको आणि अतिसैलही नको. मैद्याचे समान लहान गोळे करा. मैद्याची पारी करून सारण त्यात भरा. फार गच्च भरू नका. भरलेली कचोरी हाताने जमेल तेवढी चपटी करून घ्या. मंद आचेवर तळा. मूगडाळीऐवजी उडीदडाळ वापरली तरी चालेल.



**– सौ. अंजली करकरे**

# एकाक्ष नारळ

विष्णुपुराणात एकाक्ष नारळ हे श्री लक्ष्मीचे मूर्तिमंत प्रतीक असल्याचे आवर्जून सांगितले आहे. हा नारळ अतिशय दुर्मिळ असून इच्छिलेली वस्तू त्वरित देणारा, अशी याची ख्याती आहे. तांत्रिक प्रयोगात, धार्मिक कार्यात व तोडग्यांसाठी हा अत्यंत उपयुक्त समजला जातो.

रुद्रयामलतंत्रात त्याचे जे वर्णन आढळते, ते असे...

**द्विजटश्चैकनेत्रस्तु नारिकेलो महीतले**
**चिंतामणी सम प्रोक्तो वांच्छितार्थ**
**प्रदानतः**
**चिंतामणीः प्रस्तरतुल्यभावः**
**सम्मन्यतां धन्यतमः स्वचित्ते**
**यश्चेकनेत्रो द्विजटी सूपक्वः,**
**स नारिकेलः कृतीनो.. ऽस्ती गेहे...**


अर्थ :- जो पृथ्वीवरील इच्छिलेली प्रत्येक वस्तू त्वरित देतो, असा एक डोळा व दोन शेंड्या असलेला परिपक्व नारळ म्हणजे साक्षात चिंतामणीच होय- अशा भक्तिभावाने साधकाने त्याची आराधना व उपासना करावी.

लक्ष्मीप्राप्ती, कर्जमुक्ती, शत्रुनाश व व्यापार वृद्धीसाठी एकाक्ष नारळाचा प्रयोग आहे.

१) प्राणप्रतिष्ठित एकाक्ष नारळ जोपर्यंत तुमच्या देव्हाऱ्यात आहे, तोपर्यंत तुमच्या घरात लक्ष्मीचा वावर सदैव राहील. २) ज्या घरात एकाक्ष नारळाचे अस्तित्व आहे, अशा ठिकाणी कोणतीही दुष्ट शक्ती प्रवेश करू धजत नाही. ३) प्राणप्रतिष्ठित एकाक्ष नारळाला छेद देऊन त्यात साजूक तूप भरून जी व्यक्ती तो अग्नीला अर्पण करेल, तिचे दैन्य-दुःख व दारिद्र्य जळून भस्मसात होईल.

४) काही स्त्रियांचा गर्भपात वारंवार होतो. अशांनी त्या पुन्हा गर्भवती होताच आपल्या बेडखाली चौरंगावर प्राणप्रतिष्ठित एकाक्ष नारळ ठेवल्यास गर्भपाताचा धोका टळतो. ५) आपण पै-पै जमवून नवी वास्तू खरेदी करतो. तोंडावर गोड बोलणाऱ्या, पण पाठीमागे बोटे मोडणाऱ्या व्यक्ती आपल्याभोवती असतात. दुसऱ्याचा उत्कर्ष त्यांना सहन होत नाही. त्यांनी संक्रमित केलेले विघातक विचार आपल्या वास्तूत प्रवेश करतात आणि भांड्याला भांडे लागण्याचे प्रसंग वारंवार उद्भवतात. झोपेत दचकून अवेळीच जाग येते. मग पुन्हा डोळ्याला डोळा लागत नाही. अस्वस्थता आणि अशांतता सतत पिंगा घालू लागतात. अशा वेळी प्राणप्रतिष्ठित एकाक्ष नारळ घराच्या प्रवेशद्वाराच्या वर हूक लावून त्यात अडकवून ठेवावा. या योगे महिनाभरात असमाधानाचे समाधानात आणि अस्वास्थ्याचे स्वास्थ्यात रूपांतर होईल.

**संकलन:– श्री. अशोकराव कुलकर्णी**



# संस्थावृत्त

## क. ब्रा. संघ, सिंधुदुर्ग जिल्हा

झाशीची राणी लक्ष्मीबाईंची जयंती–गौरवदिन सिंधुदुर्ग जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या वतीने सावंतवाडी येथे साजरा करण्यात आला. या वेळी झाशी राणी लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेला माणगांव हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र पित्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी अध्यक्ष श्री. प्रदीप जोशी,



सल्लागार श्री. शिवप्रसाद कोळंबेकर, प्रसिद्ध उद्योजिका सौ. मृणालिनी कशाळीकर साधले मेसचे मालक श्री. विहंग देवस्थळी, श्री. गुरुप्रकाश सप्रे, वेदपाठशाळेचे सेक्रेटरी श्री. रविंद्र गगनग्रास, श्री. प्रशांत अळवणी उपस्थित होते. (छाया – शिवप्रसाद कोळंबेकर )

## क. ब्रा. संघ, नाशिक - गौरवदिन

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिकच्या वतीने झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जयंतीचा कार्यक्रम हरसूल येथील विश्व हिंदू परिषद संचालित आदिवासी कन्या वसतिगृह येथे साजरा करण्यात आला.

या वेळी संघातर्फे वसतिगृहातील १४ विद्यार्थिनींना दत्तक घेऊन रुपये १,१२,०००/- देण्यात आले.





मुलींनी नृत्य, समूहगीत, रोप मल्लखांब सादर केले.

मुलींना राणी लक्ष्मीबाई यांच्या पुस्तिकांचे वाटप करण्यात केली.

**विनयराज तळेकर, उपाध्यक्ष,**
**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक**


## क. ब्रा. संघ, ठाणे - गौरवदिन

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणेच्या वतीने रविवार १९/११/२०१७ रोजी साजरा झालेला कऱ्हाडे गौरवदिन कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला.

सौ. क्रांतिगीता महाबळ यांचे राणी लक्ष्मीबाई जीवनावर संदर्भपूर्ण कीर्तन झाले. त्याची काही क्षणचित्रे.

**– श्री. अजित सरवटे**





# क. ब्रा. संघ, हुबळी - गौरवदिन

I am very happy to report that we had a very good function wherein prizes were awarded to the participants in the Elocution competitions held at Chinmaya Vidyalaya and New English School.

Smt. Purna Patil, former Mayor of HDMC was the chief guest. Major (Retired) S. Hiremath, present Commissioner of HDMC was the other guest.

Kumari Shweta Jathar rendered the invocation song and also a 'povada' on Rani Lakshmibai in her melodious voice.

Both the guests garlanded the photograph of Rani Lakshmibai and lighted the lamp.

Some of the prize winners spoke. Both the guests lauded in their speeches Hubballi Karhade Brahman Sangh for kindling interest in the young minds on lives of inspiring patriots like Rani Lakshmibai.

The programme was anchored by Shri. Ramesh Herlekar. Guests were introduced by Shri. Suresh Hardikar and vote of thanks was proposed by Shri. Chidambar Kanetkar. Shri. Arawind Natekar and Shri. Shripad Herlekar were on the dias.

Many of our members, participant children along with their parents and some of the Judges in the Elocution competition attended the function.

- Shri. R. G. Deo
Chairman



# क. ब्रा. संघ, पुणे गौरवदिन

दि. १९ नोव्हेंबर २०१७ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जयंतीच्या निमित्ताने विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. एव्हरेस्ट वीरांगना अपर्णा प्रभुदेसाई ह्या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते अलंकार पोलीस चौकीतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक रेखा साळुंखे व सामाजिक कार्यकर्त्या अरुंधती सरदेसाई यांना झाशीराणी लक्ष्मीबाई सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निमित्ताने आकाशवाणीवरील सुप्रसिद्ध निवेदिका अंजली लाळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वि. वा. शिरवाडकर लिखित 'वीज म्हणाली धरतीला' ह्या नाटकाचे वाचन केले. सोहळ्याची सुरुवात दीप प्रज्वलनासोबतच सौ. सावनी पुरंदरे व त्यांच्या सहकार्यांनी केलेल्या शंखनादाने झाली. त्यानंतर सन्मान सोहळ्याचे प्रास्ताविक कऱ्हाडे ब्राह्मण, पुणे संघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देसाई यांनी केले. त्यानंतर वैशाली वर्णेकर यांच्या हस्ते विशेष अतिथी अपर्णा प्रभुदेसाई यांचा स्मृतिचिन्ह, तुळशीचे रोप आणि फेटा देऊन सत्कार करण्यात आला. कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे याच्या महिला आघाडी प्रमुख मुक्ता चांदोरकर यांच्या हस्ते नाट्यवाचन सादर करणाऱ्या अंजली लाळे, पी. इ. एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल याच्या मुख्याध्यापिका सुजाता तांबे यांचा व शंखनाद सादर केल्याबद्दल सावनी पुरंदरे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने पी. इ. एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल मधील साहसी क्रीडाप्रकार मध्ये भाग घेणाऱ्या व रस्ता सुरक्षा अभियान, महाराष्ट्र कॅडेट कोर्स , घोष पथक या तीनही पथकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थिनींचा सत्कार सर्वश्री लक्ष्मीकांत



देसाई, मकरंद फणसळकर, श्रीकांत गुर्जर, हेमंत पुराणिक यांनी केला. या पाच पुरस्काराचे स्वरूप रु. २०००/- प्रत्येकी असे होते. प्रमुख अतिथी म्हणून आपले मनोगत मांडताना अपर्णा प्रभु देसाई यांनी त्यांचे अनुभव सांगत.

त्यांच्या फौंडेशनच्या कामाचे स्वरूप स्पष्ट केले. पुरस्कारार्थी म्हणून आपले मनोगत मांडताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक रेखा साळुंखे यांनी आपल्या छोटेखानी

तिळगूळ घ्या, गोड बोला!

भाषणांमधून उपस्थितांना नव्या योजनांची माहिती देत, पोलिसांना न घाबरता त्यांना मदत करण्याचे आवाहन केले. तसेच पोलिसांकडून राबवण्यात येणाऱ्या नवीन योजनांची माहिती दिली. ज्येष्ठ नागरिकांसाठी पोलिसांतर्फे चालविल्या जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिक संघाची माहिती दिली. अरुधती सरदेसाई या गेली अनेक वर्षे एड्सबांधीत मुलांसाठी काम करत आहेत. त्याबद्दल बोलताना अरुंधती सरदेसाई यांनी ह्या मुलांच्या आश्रमाला भेट देण्याचे आवाहन केले. त्या अशा मुलांची लग्न लावून देतात.





तसेच एड्स बद्दल समाजामध्ये जनजागृती करण्याचे कामही त्या गेली अनेक वर्षे करत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा नाटेकर यांनी केले. मधुरा शेजवलकर हिने सन्मानार्थींचा परिचय करून दिला. संघाचे उपाध्यक्ष सुहास खानवलकर यांनी आभार प्रदर्शन केले. अंबर कार्यालय पुणे यांचा सुग्रास भोजनाचा आस्वाद उपस्थितांनी घेऊन कार्यक्रम संपन्न झाला. उत्तम

**मेघा कढे-नाटेकर**

## *रंगी रंगला उत्सव*



KRHD युवा ग्रुप आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ,पुणे आयोजित 'रंगी रंगला उत्सव' हा कोकणातील पारंपारिक उत्सवाचा कार्यक्रम पुण्याई सभागृहात उत्साहात संपन्न झाला. कोकणातील पारंपरिक उत्सवांची ओळख पुण्यातील रसिकांना व्हावी आणि अधिकाधिक लोक या उत्सव परंपरेशी जोडले जावेत या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता..विविध चालींवर गायल्या जाणाऱ्या आरत्या, भोवत्या, पारंपारिक टिपरी नृत्य, अभंग, गोंधळ ( देवीचा जागर), फुगड्या, मंत्रपुष्पांजली आणि केळीच्या पानांवर पंगतीने वाढलेला समाराधना स्वरूप महाप्रसाद असे या कार्यक्रमाचे भव्य स्वरूप होते. कोकणातील को.का.- को.ला.ज ग्रुप (कोट, कांटे, कोलधे, लांजा, जावडे) यांनी कार्यक्रमात रंगत आणली. सर्व वयोगटातील उत्सवप्रेमी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. अनेक मान्यवरांनी या सोहळ्याचे तोंड भरून कौतुक केले आहे

अखंड कार्यक्रमात पाच वर्षाखालील एकही मूल रडलेलं मी पाहिलं नाही. कुठलही नाटक किंवा सिनेमा पाहताना हा अनुभव आवर्जून येतो.. अनेक आजी आजोबा ही भोवऱ्यात उत्साहाने सहभागी झाले..जेवणानंतर बडीशेप चघळत थेट गाडीत जाऊन बसणाऱ्या लोकांचीही पावलं जेवणानंतर पुन्हा हॉल कडे वळली यातच सगळी सार्थकता आहे... अनेक जेष्ठ मान्यवरांकडून आम्ही या आधी हे कधीच अनुभवलं नाही आणि तुमच्यामुळे आम्हाला याचं साक्षीदार होता आलं हे ऐकणं हा आनंद शब्दातीत आहे..

ज्या चेहऱ्यावर फक्त स्मितहास्यापलिकडे कधी एकही लकेर उठली नव्हती असे अनेक चेहरे आपला मान मरातब, पेशा, समाजातील स्थान सारं सारं विसरून फक्त नामाच्या गजरात दंगून नाचत होते हाच सोहळा अभूतपूर्व होता.. हीच ती पुण्याई

थोडक्यात काय तर माणसांना माणसांशी जोडण्यासाठी फार काही करावं लागत नाही, जेव्हा लोकांचा उत्साह सीमेवर असतो तेव्हा संयोजकांच्या हातीही काही राहत नाही.सगळीकडे उरतो तो फक्त आनंदआनंद आणि आनंद..

मुलांना ध्येय, युवकांना एकोप्याची शक्ती आणि जेष्ठांना पुन्हा तारुण्याची भेट देणाऱ्या या उत्सवाचे, या सोहळ्याचे आपणही एक भाग होतो याचा अतीव आनंद आहे..

**राहुलराज**



# क. ब्रा. संघ, रत्नागिरी- गौरवदिन

राणी लक्ष्मीबाई जयंतीनिमित्त महासंघाने केलेल्या आवाहनानुसार कोट येथे श्री. राजू नवलकर यांचे घरी, कोट येथील सर्व प्राथमिक शाळांमध्ये वक्तृत्व, निबंध, ड्रॉईंग, राणीची वेशभूषा अशा स्पर्धा घेऊन १४ विद्यार्थिनींना मा. गणेशजी गुर्जर व इतर मान्यवर यांचे हस्ते गौरवण्यात आले. तसेच मा. गणेशजी गुर्जर व अन्य मान्यवरांच्या हस्ते शाळांना फोटो देण्यात आला.

या वेळी रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे सर्व सदस्य व 'क्रांतिज्वाला' कार श्री. श्रीकृष्ण जोशी उपस्थित होते.



# क. ब्रा. संघ, पुणे - कोजागरी पौर्णिमा कार्यक्रम

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे शाखेचा कोजागरी पौर्णिमेचा कार्यक्रम शनिवार, दि. ७ ऑक्टोबरला कोथरूडच्या पुण्याई सभागृहात थाटाने साजरा झाला. दुग्धपानानंतर झाशीची राणी लक्ष्मीबाईच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम पुणे आकाशवाणीवर होणाऱ्या 'चिंतन' या कार्यक्रमाचे इतिवृत्त गेली १३ वर्षे रोज पत्राने आपल्या मुलास कळवून, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये स्थान मिळवलेले डॉ. अरविंद नवरे, ज्येष्ठ तबलावादक पं. रामदास पळसुले आणि एव्हरेस्ट वीरांगना श्रीमती अपर्णा प्रभुदेसाई यांचा सत्कार संघाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतरच्या प्रस्तविकात देसाई यांनी संघाच्या कार्यक्रमांचा आढावा घेतला.

ज्यांना डॉक्टरांनी २०१२ मध्ये 'तू इथून पुढे आधार घेतल्याशिवाय चालूच शकणार नाहीस' असे सांगितले होते, त्याच अपर्णा प्रभुदेसाईंनी जेमतेम ५ वर्षांत जिद्दीने २२ मे २०१७ रोजी जगातले सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत कसे केले, यांचा उलगडा श्री. अविनाश हळबे यांनी घेतलेल्या प्रगट मुलाखतीतून झाला. मुलाखतीनंतर पं. रामदास पळसुले यांचे अत्यंत श्रवणीय असे एकल तबलावदन झाले.

संघाच्या युवा आणि महिला आघाडीच्या भावी योजनांची माहिती श्री. आदित्य पाध्ये, श्री. प्रसाद नेवाळकर आणि सौ. मुक्ता चांदोरकर यांनी दिली. यापाठोपाठ इयत्ता १० वी, १२ वी, पदवी आणि पीएचडीमध्ये उत्तुंग यश मिळविणाऱ्या सभासदांच्या मुला-मुलींचा मान्यवरांच्या शुभ हस्ते रोख बक्षिसासह सत्कार करण्यात आला. श्री. हृषीकेश पळसुले यांच्या आभार प्रदर्शनानंतर कु. आभा पुरोहित हिच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**लक्ष्मीकांत देसाई**

**अध्यक्ष - कऱ्हाडे ब्राह्मण संघ**



# निवेदन - क. ब्रा. संघ, गोवा

गोमन्तकातील विविध कार्यक्षेत्रांत कार्यरत असलेल्या कऱ्हाडे ज्ञातिबांधवांची माहिती संकलित करून कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या छताखाली ज्ञातिबांधवांना एकत्र आणावे. जेणेकरुन ज्ञातिबांधवांची माहिती सर्व गोमन्तकात पसरावी व या संघाचे कार्य गोव्यात जोमाने चालू व्हावे, हा उद्देश ठेवून दि. ८ सप्टेंबर २०१७ रोजी साखळीला पहिली बैठक घेण्यात आली. डिचोली व सत्तरी तालुक्यातील सर्व ज्ञातिबांधवांची प्रत्यक्ष सम्पर्क भेट घेऊन कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्य पुनरुज्जीवित करण्याचे प्रयत्न करावेत, असे ह्या बैठकीत ठरविण्यात आले.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ, पुणे यांच्या विनंतीवरून पूर्वी गोव्यात कार्यरत असलेला 'गोमन्तक कऱ्हाडे ब्राह्मण संघ' पुनरुज्जीवित करण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच आता व्यापक रूपाने त्याचे कार्य पूर्ण गोमन्तकासाठी चालू करावे, असा मानस आहे.

या साठी गोमातंकातील ज्ञातिबांधवांच्या मौलिक सूचनांची आवश्यकता आहे.

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) जि. ठाणे

आरोग्य समितीतर्फे आयोजित कार्यक्रम दि. २ ऑक्टो. २०१७ रक्तदान शिबिर व 'आयुर्प्रबोध' **कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली**, जि. ठाणे व वामनराव ओक रक्ततपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २.१०.२०१७ रोजी संस्थेच्या समाजमंदिर सभागृहात सकाळी ९.०० ते दु. १.०० पर्यंत रक्तदान शिबिराचे आयेजन करण्यात आले होते. शिबिरात एकूण ३६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. संस्थेने व वामनराव ओक रक्तपेढीने सर्व रक्तदात्यांचे दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

अर्थोवेद व कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवलीच्या संयुक्त विद्यमाने, आयुर्वेदाच्या प्रचारासाठी 'आयुर्प्रबोध- आयुर्वेद सर्वांसाठी-' हा प्रकल्प रविवार, दि. १९.११.२०१७ रोजी समाजमंदिर सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

या अंतर्गत डोंबिवलीतील प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य श्री. मंगेश देशपांडे संचालित- अर्थोवेद- या एकमेव आयुर्वेदिक रुग्णालयातील ७ आयुर्वेदाचार्यांच्या चमूने,

स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम् ।
आतुरस्य विकार प्रशमनम्।।

या आयुर्वेदाच्या ध्येयवाक्यानुसार आयुर्वेदाच्या सर्व शाखांची सविस्तर ओळख प्रेक्षकांना करून दिली. डॉ. सुनील, डॉ. अमित, डॉ. ऋषीकेश, डॉ. ढवळे, डॉ. घरत, डॉ. संगई या सर्वांनी पंचकर्म, औषधी निर्माण, लठ्ठपणा, आहार, विहार, शौच, वंध्यत्व, ऋतुचर्या इ. विषयांचे सविस्तर विवरण करून प्रेक्षकांचे शंकानिरसन केले.

विशेष म्हणजे, ''आयुर्वेद प्रसाराच्या या अनोख्या प्रकल्पाचे प्रेरणास्थान आहेत सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. जयंत गोखले'', असे डॉ. मंगेश देशपांडे यांनी आवर्जून सांगितले.

डॉ. जयंत गोखले यांच्या रुग्णालयात कार्यरत असलेले *Spine Surgeon* हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी गुडघारोपणासह इतर सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देऊन प्रेक्षकांच्या ज्ञानात, माहितीत मोलाची भर घातली.

आयुर्वेदाच्या वेगवेगळ्या शाखांचे संशोधक व ग्रंथलेखकांच्या माहितीची प्रदर्शनी आणि प्रेक्षकांच्या *Bone-Density, BMI* अशा मोफत तपासण्या व सवलतीच्या दरात औषधविक्री या गोष्टींचाही या कार्यक्रमात समावेश करण्यात आला होता.

अशा प्रकारे सकाळी १० वा. सुरू झालेले हे शिबिर दु. २ वा. संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे निवेदन डॉ. मनीषा वि. मोघे यांनी केले.

**प्रदीप श्री. हळबे**
**अध्यक्ष, क.ब्रा.सेवा मंडळ,**
**डोंबिवली (प.) जि. ठाणे**

वैद्य खडीवाले वैद्यक संस्थेच्या वतीने देण्यात येणारा महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार मुम्बई येथील वैद्य श्री. श्रीधर वासुदेव पराडकर यांना जाहीर झाला आहे. मा. श्री. पराडकर यांचे हार्दिक अभिनंदन!

## क. ब्रा. सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) जि. ठाणे - दिवाळी पहाट

संस्थेच्या वतीने दिनांक १९.१०.२०१७ (लक्ष्मीपूजन) रोजी सकाळी ७ वा. दिवाळीनिमित्त 'स्वरमयी' हा विशेष कार्यक्रम आयोजित केला.

गणेशपूजन, दीपप्रज्वलन व गणेशस्तवनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

या कार्यक्रमात आजच्या पिढीचे होतकरू, उच्च विद्याविभूषित कलाकारांनी आपली कला सादर केली. ज्येष्ठ गायक पं. मधुकर जोशी यांचे शिष्य श्री. ओंकार वि. घाटे व जयपूर अत्रोली घराण्याची तालीम घेणाऱ्या श्रीमती प्राजक्ता काकतकर यांनी संगीत नाटकांच्या सुवर्णकाळात नेऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. श्रीमती अनुश्री फडणीस यांच्या अभ्यासपूर्ण, ओघवत्या व मधुर निवेदनाने कार्यक्रमाची रंगत द्विगुणित केली. उत्तम साथीदारांच्या साथीने रंगलेल्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे निवेदन सौ. माधुरी श. येल्लापूरकर यांनी केले.


**– प्रदीप श्री. हळबे**

**अध्यक्ष, क.ब्रा.सेवा मंडळ,**
**डोंबिवली (प.) जि. ठाणे**

## क. ब्रा. महासंघाची पुणे येथील पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा

महासंघाने २६ नोव्हेंबर २०१७ रोजी पुण्यातील बाजीराव रस्त्यावरील 'स्वतिश्री सभागृहात' आयोजित केलेल्या सभेचे आयोजन आणि नियोजन अतिशय नीटनेटके होते. सभासदांनीही विषयबाह्य चर्चेला फाटा देत निर्णयांबाबत सकारात्मकता दाखविली. उपस्थितीही उत्तम होती. महासंघाच्या सभेला मुंबई, नागपूर, सिंधुदुर्ग, डोम्बिवली, ठाणे, पुणे, सातारा, मुलुंड, बंगळुरू, रत्नागिरी, कोल्हापूर व नाशिक या संघांनी उपस्थित राहून सक्रिय सहाभाग घेऊन चांगल्या सूचना केल्या, सातारा, सिंधुदुर्ग, पुणे मित्र मंडळ बंगळुरू या संघांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. त्या सर्व संघांचे मन:पूर्वक अभिनंदन!



सर्व सभासदांनी सभेच्या कामकाजात सक्रिय सहभाग घेऊन सभा यशस्वी केल्याबद्दल महासंघातर्फे मन:पूर्वक अभिनंदन आणि धन्यवाद!

**– गणेश गुर्जर, कार्यवाह**
**क. ब्रा. महासंघ**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू श्री. नितीन करमळकर यांचा सत्कार

दि. २६ नोव्हेंबर २०१७ रोजी संध्याकाळी श्री. नागराज, श्री. हिर्लेकर, श्री. हळबे, श्री. पराडकर, श्री. श्रीगजानन गुर्जर आणि श्री. गणेश गुर्जर यांनी सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. श्री. नितीनजी करमळकर यांची भेट घेतली आणि शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. करमळकर कुटुंबीयांचा आणि विद्यापीठाचा फोटो असलेला कप; सौ. करमळकर यांना भेट दिला.



**– संपादक**

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा यांच्या वतीने झाशीची राणी लक्ष्मीबाई व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दि.१७.११.२०१७ रोजी येथील आबासाहेब चिरमुले प्राथमिक शाळेत वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. या वेळी कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या कार्यकारिणी सदस्यांचे अत्तर- गुलाबपाणी व फूल देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी सुरेल स्वागतगीत सादर केले. शिक्षिका सौ. सावंत यांच्या प्रास्ताविकानंतर कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब भाटे यांनी संघाच्या सामाजिक बांधिलकीचा आढावा घेतला. यानंतर स्पर्धा पार पडली. विद्यार्थ्यांनी राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, अहल्याबाई होळकर, लो. टिळक अशा विविध विषयांवर वेषभूषेसह वक्तृत्व कला सादर केली व सर्वांची मने जिंकली. विजेत्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका सौ. प्राची शहाणे उपस्थित होत्या.

– सुधीर करंबेळकर

अध्यक्ष,क.ब्रा. संघ, सातारा



## कऱ्हाडे ब्राह्मण संघ,नाशिक

दि. १३ ऑक्टोबर २०१७ यंदाच्या वर्षी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिकच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेचा एक आगळा-वेगळा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपाध्यक्षा सौ. सुप्रिया फणसळकर यांनी एक वेगळी कल्पना सभासदांसमोर मांडली होती. नाशिकजवळ असलेल्या हरसुल येथील वनवासी मुलींच्या वसतिगृहामधील विद्यार्थिनींना आपल्याकडे आमंत्रित करावे व त्यांना आपले कलागुण सादर करण्याची संधी द्यावी, असे सुचवले होते; जेणेकरुन त्या मुलींना शहरातील वातावरणाची अनुभूती घेता येईल, त्यांना कलागुण सादर करण्याची संधी मिळेल व त्यांचा आत्मविश्वास वाढेल. ही कल्पना सर्वांनाच आवडली. त्यानुसार या वसतिगृहाचे विश्वस्त व संघाचे सभासद प्रा. श्री. हेरंब गोविलकर यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम संपन्न झाला.

समर्थ मंगल कार्यालय, येथे सायंकाळी ७.०० वा. वसतिगृहातील २० विद्यार्थिनी, त्यांचे दोन शिक्षक व संघाचे ६० सभासद उपस्थित होते.




सुरुवातीला उपाध्यक्षा सौ. सुप्रिया फणसळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रा. श्री. हेरंब गोविलकर यांनी वसतिगृहाचे कार्य विशद केले. सौ. सुप्रिया फणसळकर यांनी कु. सोनाली व कु. मोनाली यांच्याशी गप्पा मारून त्यांची ओळख सर्वांना करून दिली.

सांस्कृतिक कार्यक्रमास प्रारंभ झाला. सुरवातीस काही विद्यार्थिनींनी एक देशभक्तिपर गीत सादर केले, जे अतिशय सुरेल व तालबद्ध होते. कार्यक्रमाची सुरवात अशी सुरमयी झाली.

त्यानंतर इ. ५ वी व ६ वी मधील तीन विद्यार्थिनींनी योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. त्यातील त्यांचे कौशल्य, लवचिकता आणि लयबद्धता बघून सर्व सभासदांनी त्यांना भरभरून दाद दिली आणि कौतुकाची पावतीही! फारसे मार्गदर्शन नसताना त्यांचे हे सादरीकरण म्हणजे खरोखरीच एक आश्चर्य!

यानंतर विद्यार्थिनींनी कृष्णावरील एक नृत्य, सिनेमातील एक नृत्य, तारकानृत्य यांचे सादरीकरण केले. त्यांची लयबद्धता, तालावर थिरकणारी पावले, नृत्यातील नजाकत, हावभाव बघून सर्वांनाच अचंबा वाटला. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाटाने त्यांचे कौतुक केले.



शेवटी रामरक्षेमधील १० श्लोकांचे सामूहिक पठण काही विद्यार्थिनींनी केले व सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता झाली. या मुलींना भेटवस्तू व पुष्प देऊन संघातर्फे त्यांचे कौतुक करण्यात आले.

तसेच संघाच्या सभासदांच्या पाल्यांचा शैक्षणिक क्षेत्रातील यशाबद्दल सत्कार करण्यात आला. वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल श्री. चंद्रकांत ढवळे यांचा सत्कार करण्यात आला.



उपाध्यक्ष अॅड. श्री. विनयराज तळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सचिव श्री. सुरेश जठार यांनी आभार मानले. सौ. वेदा निगुडकर व श्री. नरेंद्र पराडकर यांनी सूत्रसंचालन केले.

सर्वांनी स्नेहभोजन व दुग्धपानाचा आस्वाद घेतला आणि कोजागरी पौर्णिमेचा हा भरगच्च कार्यक्रम सोहळा संपन्न झाला.

**– सौ. सुप्रिया फणसळकर**

**क.ब्रा. संघ, नाशिक**

## कऱ्हाडे ब्राह्मण रत्नागिरी संघाचा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा

रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा दि. ३१ डिसेंबर २०१७ रोजी सायंकाळी राणी लक्ष्मीबाई सभागृहात झाला. त्यावेळी कऱ्हाडे



ब्राह्मण संघाचे अध्यक्ष माधव हिर्लेकर, उपाध्यक्ष मिलिंद आठल्ये, कार्यवाह सौ. अर्चना लळीत उपस्थित होते.

पुरस्काराचे वितरण कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे कार्यवाह श्री. गणेश गुर्जर ह्यांच्या हस्ते झाले.

दै. सकाळाचे देवरुखमधील पत्रकार संदेश सप्रे यांना 'दर्पण' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आचार्य नारळकर पुरस्कार राजापूरमधील सौ. श्रेया सुधा करंबेळकर यांना, धन्वंतरी पुरस्कार पांगरे-राजापूर येथील डॉ. अविनाश सप्रे यांना प्रदान करण्यात आला. तसेच नारदीय कीर्तन परंपरा सुरु ठेवून भक्तीमार्ग व समाजप्रबोधनाचे काम करणारे नृसिंहवाडी येथील घाग यांना आदर्श कीर्तन पुरस्कार व वेदमूर्ती सचिन भाटवडेकर यांना आदर्श पौरोहित्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष पुरस्कार मिलिंद टिकेकर, सुप्रिया खंडकर, सुहास ठाकूरदेसाई व सौ. श्रुती आठल्ये यांना देण्यात आले.

पाचवी, आठवी शिष्यावृत्तीसह दहावी, बारावी च पदव्युत्तर यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. मिलिंद आठल्ये यांनी सत्कारमूर्तींचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन केतकी गुणे, मानस देसाई, श्री. आंबेकर यांनी केले. उदय काजरेकर यांनी आभार मानले. त्यानंतर प्रकाश सप्रे यांचा 'सप्रेम नमस्कार' हा विनोदी एकपात्री कार्यक्रम झाला.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर

दिनांक १७ डिसेंबर, २०१७ रोजी सायंकाळी ४.३० वाजता ब्राह्मण सभा करवीरचे मंगलधाम सभागृह येथे कऱ्हाडे ब्राह्मण संघ कोल्हापूरची २९ वी वार्षिक सर्व साधारण सभा पार पडली. मोठ्या प्रमाणावर सभासद हजर होते. अध्यक्षस्थानी संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा गुणे होत्या.

कार्यवाह श्री. धर्मराज पंडीत यांनी सभेची नोटीस वाचन करुन सभेस सुरुवात केली. अहवाल सालात संस्थेचे सभासद व इतर मान्यवर यांचे निधनाबद्दल शोक व्यक्त करुन विषय पत्रिकेवरील विषयाप्रमाणे सभेस सुरुवात झाली. सन २०१७-१८चे अंदजपत्रकास मान्यता घेणे, तपासणी अहवालास मंजूरी घेणे इत्यादी आर्थिक विषयाचे वाचन करुन कोषाध्यक्ष श्री. आनंद खंडकर यांनी मंजूरी घेतली. संस्थेच्या सभासदांनी विचारलेल्या शंकाचे निरसन अध्यक्षा सौ. अनुराधा गुणे यांनी केले.

यानंतर अध्यक्ष अनुराधा गुणे यांनी सभासदांना काही विषय मांडावयाचे असल्यास मांडावेत असे आवाहन केले. त्यास माजी अध्यक्ष श्री. म. रा. जावडेकर, माजी उपाध्यक्ष श्री. आबा चिंचाळकर, श्री. अलुरकर इत्यादींनी मनोगते व्यक्त केली.

यानंतर नूतन सदस्य सौ. शारदा लुकनुके व श्री. रघुनाथ धुपकर यांची सभासदांशी ओळख करुन देण्यात आली. यानंतर पत्रिके वरील विषय संपल्याने अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.



उपाध्यक्ष श्री. मिलींद पावनगडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले व अल्पोपहारानंतर सभेचा समारोप झाला.

**– मिलिंद पावनगडकर**
**उपाध्यक्ष, क.ब्रा. संघ, कोल्हापूर**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे

आजच्या घडीला समस्त कऱ्हाडे ब्राह्मणजनांना हा गौरवदिन कधी व का असतो, हे चांगलेच माहित आहे. बडोद्यातील कऱ्हाडे ब्राह्मण संघाने यंदा प्रथमच आपला हा गौरवदिन म्हणजेच वीरांगणा झाशीची महाराणी लक्ष्मीबाई यांचा जन्मदिवस दि. १९ नोव्हेंबर या दिवशी रविवार असल्याने सर्वांच्या सोयीनुसार हा दिवस गुरूवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला.

अखिल भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे पाठबळ आणि बडोद्यातील नामवंत मराठी माध्यमाची शाळा महाराणी चिमणाबाई हायस्कुलच्या सर्वतोपरी उत्कृष्ट सहकार्याने हा कार्यक्रम आटोपशीर तरीही देखणा होऊ शकला.

श्रीमती रेखा बर्वे यांनी कार्यक्रमासाठी राणी लक्ष्मीबाईचा सुंदर फोटो उपलब्ध करून दिला.

कार्यक्रमाच्या आरंभी श्रीमती रोहिणी खांडेकर यांनी प्रस्तुत कार्यक्रमाविषयी थोडक्यात प्रास्ताविक मांडले. त्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. निळकंठ वा. मुळ्ये यांनी आपल्या वक्तव्यातून हा गौरवदिन साजरा करण्यामागची भूमिका स्पष्ट करून शाळेकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त केला.

प्राथमिक विभागातील विद्यार्थीनीं गायिलेले राणीचे गौरव गीत, एकपात्री अभिनय - महाराणी लक्ष्मीबाई आणि एका विद्यार्थीनीने या तेजस्वी विरांगणेची केलेली जीवनगाथा सर्व उपस्थितांसमोर सादर करून पूर्ण कार्यक्रमाला रंगतदार आणि प्रेरक स्वरूप दिले.

यानंतर सर्व सहभागी सुकन्यांना बडोद्याच्या संघातर्फे रोख पारितोषिके देण्यात आली. निबंध, वक्तृत्व व खेळ या विभागात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या तीन विद्यार्थीनींना महासंघातर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली.

शेवटी पुन्हा एकदा म. चि. हायस्कुलचे आभार मानून सर्व विद्यार्थ्यांना मिठाई वाटण्यात आली. विद्यार्थ्यांनी म्हटलेल्या 'पसायदाना' च्या प्रस्तुतीने कार्यक्रमाची छान सांगता झाली.

प्रमाणपत्रे वितरण :

१) नन्दिनी जाधव - कबड्डी

२) भुवनेश्वरी मानकर - निबंध

३) प्रणाली गावडे - वक्तृत्व

**– श्री. निळकंठ मुळ्ये**
**अध्यक्ष,**
**मो. : ९८२५६६५९७३**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई



कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई यांच्यातर्फे बुधवार दि. २२ नोव्हेंबर रोजी 'राणी लक्ष्मीबाई गौरव दिन' साजरा करण्यात आला. झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या जयंतीचे औचित्य साधून हा कार्यक्रम दरवर्षी साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमास सन्मानीय अतिथी म्हणून सुप्रसिद्ध कीर्तनकार व व्याख्यात्या 'श्रीमती गुणिला शशिकांत मेघे' उपस्थित होत्या. त्यांचा सत्कार संघाचे अध्यक्ष श्री. श्रीराम देव यांच्या हस्ते शाल. स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

सेवा सदन शाळेतील क्रीडाशिक्षक श्री. सुभाष अडांगळे कार्यक्रमास शाळेतर्फे हजर होते. त्यांचा सन्मान संघाचे कार्याध्यक्ष व महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. तसेच शाळेसाठी झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंची प्रतिमा व विद्यार्थिनींना वाटण्यासाठी महिती पुस्तिका देण्यात आल्या.

या वर्षी सेवासदन शाळेतील इ. ५वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या व क्रीडक्षेत्रात यशस्वी असलेल्या कु. सोनाली अनंत नवले, व कु. सुचिता शांताराम बरके व कु. गीता राजकुमारी शहा या तीन विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थिनींना प्रत्येकी रु. एक हजार रोख, पुष्पगुच्छ आणि महासंघातर्फे प्रशस्तिपत्र व राणी लक्ष्मीबाईची माहितीपुस्तिका भेट देण्यात आली. संघाचे अध्यक्ष श्री. श्रीराम देव, कार्याध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर व कार्यवाह श्री. हेमंत किर्लोस्कर यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना क्रीडाशिक्षक श्री. सुभाष अडांगळे सर म्हणाले, हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून गौरवाबद्दल शाळेतर्फे धन्यवाद व्यक्त केले.

सन्माननीय अतिथी श्रीमती गुणिला मोघे यांनी राणी लक्ष्मीबाई व स्त्री शक्ती या विषयावर आपले विचार अतिशय मार्मिकपणे व इतिहासाचे दाखले देत मांडले. कीर्तनकार असल्याने त्यांच्या सुरेल आवाजात पदे सादर करुन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन सौ. अदिती अतुल तांबे यांनी अतिशय उत्तम पद्धतीने केले. त्यानंतर श्री. शेखर मावळंकर यांनी संघाच्या कार्याची माहिती दिली.

श्री. श्रीकांत हर्डीकर यांनी संघातर्फे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**हेमंत किर्लोस्कर**


स्थापना:
१० मे १९१७

फोन नं. : २४४५६०४७
मोबा. : ९८५०९७९७०६

शतकपूर्तीनंतरची दिमाखदार वाटचाल

मे. डी. व्ही. भाटवडेकर

क्लॉथ मर्चंट्स

६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू.म.वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११०३०.
email : dwb10051917@gmail.com

सकाळी १० ते १ ● दुपारी ४॥ ते ८॥ ● सोमवार बंद

कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सूटिंग, लाँग क्लॉथ,
पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीट्स,
टॉवेल्स, रेडिमेड पायजमे,
बंडी - कुडते - बर्म्युडा - ३/४ पँट्स

# मृत्यूनंतर आत्म्याचा प्रवास

हा संपूर्ण विषय खूप गंभीर आहे. सर्वसामान्यांना या बाबत अनेक शंका असतात. म्हणून समस्त जनांना समजण्यासाठी संपूण माहिती; प्रश्नोत्तर स्वरूपात दिली आहे.

**प्रश्न :-** आत्मा जेव्हा शरीर सोडून जातो, तेव्हा त्याला कळत असते काय की- आपण शरीर सोडले आहे म्हणजे मृत्यू मिळाला आहे? त्याला आपल्या माणसांची आठवण येत असते काय?

असे म्हणतात की- त्यांना खूप वेगवेगळे प्रवास असतात. त्यामध्ये आपण सारखे आठवण काढत राहिलो, तर त्यांना त्या प्रवासात त्रास होतो.

कृपया कळावे, नक्की काय असते?

**उत्तर :-** प्रथम आपला स्थूल देह म्हणजे अन्नमय कोश गळून पडतो- पक्व झालेले झाडाचे फळ आपोआप जमिनीवर पडावे, तसा.

या वेळेस देहातील दहा प्राण शरिरातून क्रमाक्रमाने बाहेर पडताच आत्मा चार कोषासह सूक्ष्म देह धारण करून बाहेर पडतो, तेव्हा या देहाला मरण येते. आत्मा अजरामर आहे. देहाभोवतीच हा आत्मा घुटमळत असतो. घरात रडारड सुरू होते, शेवटी स्मशानभूमीत या देहावर अग्निसंस्कार करतात. आपल्या जीवनातला तो शेवटचा यज्ञ असतो, म्हणून याला अंतेष्टी म्हणतात. अंत म्हणजे शेवटचा आणि इष्टी म्हणजे यज्ञ.

अंतेष्टीच्या वेळेस जे मंत्र म्हटले जातात, त्याचा अर्थ असा आहे की- मेलेल्या व्यक्तीला संबोधून मंत्र आहेत, कारण आत्मा तिथे हजर असतो व तो हे सर्व पाहत असतो. तेव्हा त्या मंत्राचा आशय असा आहे की- आता तुमचा या देहाशी काहीही संबंध राहिलेला नाही, तुम्ही आता पुढच्या मार्गाला जा. याला 'गती प्राप्त होणे' म्हणतात. 'आता आम्ही तुमचा हा देहसुद्धा जाळून टाकणार आहोत' असे म्हणून त्या प्रेतावर संस्कार करतात. जो संस्कार करणारा असतो, तो आपल्या डाव्या खांद्यावर पाण्याने भरलेला माठ घेऊन प्रेताला अपसव्य म्हणजे डावी प्रदक्षिणा घालतो. या वेळेस एका दगडाने खांद्यावरील मडक्याला एक भोक पाडतात. अशा तीन प्रदक्षिणा करून प्रेताच्या मस्तकाजवळ उभे राहून ज्या दगडाने माठाला छिद्र पाडले गेले, तो दगड खांद्यावर माठ असणाऱ्याच्या मागे ठेवतात. मग त्या दगडावर खांद्यावरील माठ मागे सोडून देतात तेव्हा त्या माठाचा फऽऽऽट् असा आवाज होऊन तो फुटतो. यालाच 'घटस्फोट' असे म्हणतात. (आता नवरा किंवा बायको जिवंत असतानाच घटस्फोट घेतला जातो) या ठिकाणी डाव्या मनगटाने बोंब मारली जाते आणि सांगितले जाते की, 'तुमचा-आमचा संबंध संपला, आता तुम्ही इथून जा.' मग तो दगड गळ्यात घातलेल्या वस्त्रामधे बांधतात. याला 'अश्मा' असे म्हणतात. त्यानंतर प्रेत जाळले जाते. आत्मा हे सगळं पाहत असतो. त्याला आपला देह जळताना पाहून वाईट वाटते, त्याला रडायला येते. (येथे अशी कुणी शंका घेऊ नये की, आत्मा रडतो का? तर आत्मा अजूनही चार कोषांमधे बद्ध आहे व यात मनोमय कोष असल्यामुळे वासना- भावना असतात) प्रेताला अग्नी दिल्यावर आपण घरी येतो. तो आत्माही आपल्यासोबत घरी येतो; मात्र तो फडक्यात बांधलेल्या अश्म्यावर बसतो, म्हणून फडक्यात बांधलेला अश्मा दाराच्या बाहेर ठेवतात. दहा दिवस हा आत्मा तिथे बसलेला असतो.

घरात दक्षिणेकडे तोंड करून दिवा लावला जातो. त्याला नमस्कार करून आलेली मंडळी निघून जातात. घरातील माणसं अघोळ करून पिठलं-भात खायला मोकळी होतात ........

पुढे काय होते...?

अश्मा घराबाहेर ठेवतात, आलेली मंडळी दिव्याला नमस्कार करून निघून जातात आणि घरातील मंडळी पिठलं-भात खाऊन दुःख करीत बसतात. पुढे अशी अंधश्रद्धा आहे की- मेलेल्या व्यक्तीला पुढील मार्ग दिसावा म्हणून दिवा लावतात व त्या दिव्याखाली राख किंवा पीठ पसरून ठेवतात, कारण गेलेल्या माणसाला कोणता जन्म मिळाला त्याची पावलं त्या दिव्याखालील पिठावर किंवा राखेवर, उमटतात- असा सर्वदूर समज आहे. पण हा समज पूर्णतः चुकीचा आहे. लगेच त्याला दुसरा जन्म मिळत नाही, त्याची प्रक्रिया आहे. ती आपण पुढे पाहणार आहोत.

आता हा जो दिवा लावला जातो, तो म्हणजे मृत व्यक्तीचे प्रतीक आहे. आता फोटो काढण्याची व्यवस्था आहे म्हणून गेलेल्या व्यक्तीचा फोटो लावला जातो; पण पुरातन काळी फोटो काढायची सोय नव्हती म्हणून त्या आत्म्याचे प्रतीक, आत्मज्योत म्हणून पणतीमध्ये ती ज्योत

दहा दिवस तेवत ठेवतात. कारण दहा दिवस आत्मा घराबाहेरच्या अश्म्यावर असतो आणि दहा दिवसांनंतरच त्याचा पुढचा प्रवास सुरू होतो.

त्या दहा दिवसांत अनेक नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, परिवार भेटायला येतात. घरातील मंडळी रडत असतात. आलेली मंडळी गेलेल्या व्यक्तीबद्दल घरात चांगलं बोलतात, बाहेर पडले की नको ते बोलतात- हे सगळं तो आत्मा पाहत असतो, ऐकत असतो. आपल्याबद्दल कोण खरं-खोटं बोलतो, कोण खरं-खोटं रडतो- हे सगळं त्याला कळत असतं. त्यामुळे त्याला खूप दुःख होतं व रडायला येतं.

या दहा दिवसांच्या आत प्रेताची रक्षा व अस्थींचं विसर्जन वाहत्या पाण्यात मातीच्या किंवा तांब्याच्या कलशातून कलशासकट करावं.

दहाव्या दिवशी त्या अश्म्याला घेऊन घाटावर जातात. तिथे अग्नी देणाऱ्याने क्षौर करावे- म्हणजे दाढी, मिशा व डोक्यावरील केस काढावेत. या घाटावर जो विधी केला जातो, तो काय असतो? या आत्म्याचा प्रवास कसा सुरू होतो व त्याचे पुढे काय होते? तर, दहाव्या दिवशी ज्या अश्म्यावर आत्म्याचा वास असतो, तो अश्मा घेऊन घाटावर येतात. क्षौर करतात आणि त्या आत्म्याला सद्गती मिळण्यासाठी संस्कार करतात. ते संस्कार कोणते, ते आता पाहू....

एकाने शंका विचारली की, क्षौर का करतात? त्याचे उत्तर असे आहे की- जेव्हा आपण एखादे पुण्य कर्म करतो, एखादे व्रत करतो, अनुष्ठान करतो; तेव्हा क्षौर करावे, कारण आपला देह शुद्ध करूनच अशी कर्मे करावीत. आपण दररोज अनेक प्रकारची पापं कळत-नकळत करत असतो आणि आपण केलेली पापे आपल्या देहात आपल्या केसांना घट्ट धरून बसतात. म्हणून दर पौर्णिमेला व अमावास्येला प्रत्येकाने क्षौर करावे. संन्यासी अजूनही दर अमावास्या व पौर्णिमेला क्षौर करतात. पण आता केस वाढवायची फॅशन आहे. एखाद्या प्रसिद्ध हीरोने डोक्याचा गोटा केला आणि दाढी-मिशा भादरल्या की, आमचे सगळे हिंदू तरुण आपलं डोकं भादरून व मिशी काढून टाकतील, बाप जिवंत असतानासुद्धा.

थोडक्यात, एका जीवाला सद्‌गती देणं हेसुद्धा पुण्य-कर्मच आहे. त्यामागचा दुसरा हेतू हा असतो की मुंडण करुन त्या गेलेल्या माणसाबद्दलची कृतज्ञता, भावना, प्रेम व्यक्त करण्याची प्रथा आहे. दहाव्या दिवशी तीन पिंडं करून त्याच्या शेजारी हा अश्मा ठेवतात व मंत्रयुक्त त्या आत्म्याला पिंडामधे विलीन करतात. त्यांना असे सांगितले जाते की, तुमचा देह जाळून टाकला आहे, तुमच्या नावाने क्षौर केले आहे; आता तुमचे येथे काहीही शिल्लक राहिलेले नाही. आता तुम्ही पुढच्या मार्गाने सद्‌गतीला जा. अशा आशयाचा तो विधी केल्यानंतर तो पिंड एका बाजूला नेऊन ठेवतात. त्या आत्म्याची वासना कशातच राहिली नसेल, तर कावळा त्या पिंडाला पटकन् शिवतो; अन्यथा तासन्‌तास गेले तरी शिवत नाही. कारण आत्मा त्या पिंडावर बसलेला असतो व तो कावळ्याला जवळ येऊ देत नाही. कावळा आणि कुत्रा हे दोनच प्राणी असे आहेत की, त्यांना मृत्यू व आत्मा दिसतो. म्हणून कुणी मरणार असेल, तर तिथली कुत्री भेसूर रडतात.

कावळा शिवल्यानंतर मग सगळे त्या अश्म्याला म्हणजे दगडाला अंगठ्यावरून पाणी देतात. याला 'तर्पण' असे म्हणतात.

एकाने प्रश्न विचारला की, अंगठ्यावरूनच पाणी का देतात?

त्याचे उत्तर असे आहे की- देवाला, ऋषी आणि पितर यांना जे पाणी दिले जाते, त्याला तर्पण असे म्हणतात. आपल्या हाताची पाच बोटं आहेत. त्यातील अंगठा आणि अंगठ्याशेजारील पहिले बोट- ज्याला तर्जनी म्हणतात. ही दोन बोटे पितरांकरता वापरावीत. मधले बोट स्वतःच्या कपाळाला गंध किंवा कुंकू लावण्याकरता वापरावे. करंगळीच्या शेजारचे बोट अनामिका याने देवाला, गुरुंना, साधूसंतांना गंध लावावे. म्हणून देवाला तर्पण करताना सरळ हातावरून पाणी द्यावे, ऋषींना तर्पण करताना करंगळीच्या बाजूने तिरकी ओंजळ करून पाणी द्यावे आणि पितरांना अंगठ्याच्या बाजूने तिरपा हात करून पाणी द्यावे.

एकाने विचारले. एक शंका आहे. हल्लीच्या धावपळीच्या जीवनात समजा जर आपल्या अगदी जवळचे कोणी निवर्तले व सुतक असेल, तर सुतक असलेल्या व्यक्तीने सुतकात त्याचा व्यवसाय अथवा कार्यालयात जाऊन त्याचे कर्तव्य करणे जरुरीचे असल्यास ते त्याने करावे का? त्या संदर्भात व यादरम्यान अन्नग्रहण करण्याबाबत योग्य त्या यमनियमां बाबत मार्गदर्शन करावे, ही विनंती.

शंका-निरसन ........

वरील शंका विचारली आहे, तिचे उत्तर :- सुतकामधे घरातील देवपूजा व कोणतेही मंगल कार्य करू नये अथवा कुठल्याही मंगल कार्यास जाऊ नये, कुठल्याही देवळात जाऊ नये, मात्र देवतेचे बाहेरून दर्शन घ्यायला हरकत नाही. आपला जो नित्यनियम आहे, तो करावा उदाहरणार्थ हरिपाठ वाचन, गायत्री मंत्र सोडून इतर नामजप, कीर्तन-प्रवचन करण्यास हरकत नाही. नित्याची नोकरी, कामधंद्यास जायला हरकत नाही. मात्र

ज्याने अग्नी दिला आहे. त्याने वरील कोणत्याही गोष्टी करू नयेत व दहा दिवस घराबाहेर पण जाऊ नये. सुतकामध्ये पलंग, गादीवर झोपू नये, चहा सोडून कुठलेही गोड पदार्थ खाऊ नयेत. दररोज अंघोळ करावी, मात्र कपाळाला तिलक लावू नये. अत्तर अथवा स्प्रे-पर्फ्युम वापरू नये, नवे वस्त्र परिधान करू नये. बाकी नित्याचे व्यवहार चालू ठेवावेत. दहाव्या व अकराव्या दिवशी घरातील सर्वांनी डोक्यावरून अंघोळ करावी, सुतकातील सर्व कपडे धुवावेत आणि घरात सगळीकडे गोमूत्र शिंपडावे. अकराव्या दिवशी कपाळाला कुंकू, टिकली, गंध लावावे.

या आत्म्याला पुढील गतीकरता अकरावा, बारावा व तेराव्या दिवशीचे विधी करावेत.

चवदाव्या दिवशी घरात निधनशांत व उदकशांत करावी आणि मगच घरातील देवपूजा करावी. त्या दिवशी खांदेकऱ्यांना, नातेवाइकांना गोडाचे भोजन द्यावे. संध्याकाळी अग्नी देणाऱ्याने डोक्यावर नवी टोपी घालावी, खांद्यावर टॉवेल किंवा उपरणे घ्यावे आणि शंकराच्या मंदिरात जाऊन गाभाऱ्यात तुपाचे निरांजन लावून ठेवावे. शंकर ही मृत्यूची देवता आहे. आत्म्यास सद्‌गती प्राप्त व्हावी व कुटुंबातील सर्वांचे रक्षण करावे, अशी प्रार्थना करून डोक्यावरील टोपी व खांद्यावरील उपरणे तिथेच काढून ठेवावे. लावलेले निरांजन घरी आणू नये.

**सुतक कोणाचे नसते ?**

आधार : निर्णयसिंधु, गरुड पुराण

मरणाच्या इच्छेने खूप उपवास करुन देह ठेवणे, शस्त्राने, विष पिऊन, पाण्यात बुडी घेऊन, टांगून घेऊन (फासी घेऊन), पर्वतावरून उडी मारून इत्यादी कारणाने मृत असता- आत्महत्या केली असता- अशौच नाही, म्हणजे सुतक नाही.

गुरुहत्या करणारा वगैरे अशा प्रकारच्या त्याज्य व्यक्तीचे दाहकर्म करू नये अथवा त्याचे शौचही पाळू नये.

नास्तिक, नीच कर्म करणारे, पितृ कर्म जे करत नाहीत अशाकडे जेवण सुद्धा करू नये, तसेच पाणीसुद्धा पिऊ नये.

सर्वांनी नियमात, चांगले वागावे असा शास्त्राचा उद्देश असावा, म्हणूनच असे कडक नियम केले असावेत.

आपण हिंदू आहोत; माहिती असावी, म्हणून हा प्रपंच.

**सौजनयः श्री. मनोहर करंबेळकर गुरुजी**




# यशापयशाची जबाबदारी

आपल्या समस्या काय? आपल्याला जे मिळते, ते आपल्याला मान्य नसल्याने होणारा त्रास म्हणजे आपल्या सर्व समस्यांचे मूळ. जीवन हे एक चक्रात सुरू असते. कधी चांगले तर कधी वाईट प्रसंग येत असतात. जे वाईट भासते ते व्हायलाच नको, अशी आपली धारणा असल्याने त्याचा आपल्याला त्रास होतो. पण जास्त त्रास होतो जेव्हा आपल्याला जे नकोसं असतं त्याचा दोष दुसऱ्या कुणाला तरी देत असतो, तेव्हा.

आपला समज असा आहे की, मी स्वतःसाठी वाईट कसे निवडणार? त्यामुळे जे होत आहे त्याला दुसरे कुणी तरी किंवा नशीब आणि देव तरी कारणीभूत आहे. मग असा विचार करून आपण जास्तच दुखी होतो.

रामायणात सीतेच्या परिस्थितीला व भोगाला रावण आणि रामालासुद्धा कुठे ना कुठे कारणीभूत ठरवले जाते. पण खरेच तसे होते का?

सीतेने केलेले पाच निर्णय संपूर्ण रामायणाला आणि सीतेच्या भोगाला कसे कारणीभूत ठरले.

* ते पाच निर्णय असे आहेत: *

१. रामाला वनवास ठोठावला गेल्यावर सीतेने त्याच्यासोबत वनवासात जायचा निर्णय स्वतः घेतला.

२. लक्ष्मणाने निक्षून सांगितले असतानाही तिने रावणाला भिक्षा द्यायला लक्ष्मणरेषा ओलांडण्याचा निर्णय घेतला.

३. जेव्हा हनुमानाने सीतेला लंकेतून चलण्याचा आग्रह केला; तेव्हा सीतेने निर्णय घेतला की, रामाने तिथे येऊन रावणाचा पराभव करून तिला नेल्याशिवाय ती अयोध्येला परतणार नाही.

४. रावणाला हरवल्यावर रामाने सीतेला सांगितले की त्याने अयोध्येची आणि कुळाची मर्यादा राखली, आता सीता तू कुठेही जायला मोकळी आहेस. त्या वेळी सीतेने रामासोबत जायचा निर्णय घेतला आणि त्यासाठी अग्निपरीक्षा देण्याचाही निर्णय घेतला.

५. सरते शेवटी जेव्हा लव- कुश भेटल्यावर आणि जनमानसाने कौल दिल्यावर रामाने सीतेला अयोध्येला परत चलण्याची विनंती केली, त्या वेळी सीतेने भूमीत परत जाण्याचा निर्णय घेतला.

ह्या सर्व निर्णयांमागची कारणे कुठलीही असोत, पण अधिकांश वेळी सीतेला निर्णय घेण्याचा अधिकार होता.

त्याचप्रमाणे आपल्या आयुष्यात होत असलेल्या अधिकांश घटनाक्रमांमध्ये आम्हाला निर्णय घेण्याची संधी मिळते. त्या वेळी आपण कुठला निर्णय घेतो, हे आयुष्यातल्या पुढच्या घटनांना कारणीभूत ठरते.

तुमची पत्नी तुम्हाला हवं तशी वागत नाही. पण लग्न करताना तुम्ही तिची निवड केली होती... कुठल्या कारणाने, ती सुंदर दिसते, शिकलेली आहे, पैसा कमावते, व्यवस्थित राहते, स्मार्ट आहे, स्टाइलिश आहे. यापैकी कशासाठी? ती तुम्हाला आवडली होती. पण त्या वेळी तिने तुमच्या इच्छेप्रमाणेच वागायला हवं, अशी अट तुम्ही ठेवली होती का?

तुम्हाला नोकरीत हवा तेवढा पैसा मिळत नाही. पण ज्या वेळी शाळेत आणि कॉलेजला अभ्यासात मेहनत करायची वेळ होती, त्या वेळी तुम्ही पूर्ण मेहनत करायचा निर्णय घेतला होता का? कि त्यावेळी दोस्तांसोबत वेळ घालवायचा निर्णय तुम्ही घेतला होता? नोकरीत बढतीसाठी नवनवीन शिकायची आवश्यकता असते, हे माहीत असताना तुम्ही मेहनत घेतली की, दिवसभर काम करून थकून जातो म्हणून सोडून दिलं?

आणि ब्लड प्रेशर वाढणे चांगले नाही, डायबिटिस मुळे डोळे आणि किडनी खराब होतात, सिगारेट आणि तंबाखूसेवनाने आजार होतात... इत्यादींची संपूर्ण जाणीव असतांना तुम्ही शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याची काळजी घेण्याचा निर्णय घेता की... ?

आपलं आयुष्य कसं असावं, हा निर्णय घेण्याचा अधिकार प्रत्येकाला असतो. जे विद्यार्थी आई-वडिलांनी पसंतीचं करिअर करू दिलं नाही म्हणून आपल्या अपयशाचं दोष त्यांना देतात, तेही घरच्यांचा विरोध असतानाही व्यसनं हमखास करतात आणि आपल्याच पसंतीचा जोडीदार आणतात. ह्यावरून स्पष्ट आहे की, आपल्याला जिथे सोईस्कर असते तिथे आपण आपले निर्णय घेतो आणि इतर ठिकाणी आपल्या त्रासाचा किंवा अपयशाचा दोष दुसऱ्यांना देतो.

रामायणाच्या ह्या वेगळ्या पैलूला आपल्या घरात जरूर जागा द्या. त्रास असतानादेखील आयुष्यातली संतुष्टी वाढेल आणि मुलांनाही जीवनाचा एक आवश्यक पैलू देता येईल.

**सौजन्य : श्री. देवदत्त पटनाईक**

 | तिळगूळ घ्या, गोड बोला!




WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12%
of facebook posts are read
29%
of tweets are read
31%
of emails are opened
98%
of text messages are read
CHECKED
150
TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75%
of people prefer receiving marketing messages via SMS
15%
prefer receiving email ads
10%
prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
www.2Factor.in
95-5459-5459

# घसा दुखत आहे?

**घसा दुखणे –** दूध, हळद व साखर याचे गरमागरम मिश्रण; पिण्याने घसादुखी कमी होते. लवंग चघळण्यानेही घसादुखी कमी होते.

**घसा खवखवणे–** बरेच वेळा खवखवण्याचा त्रास आपल्याला होतो. अशा वेळी घसा खवखवत असल्यास खडीसाखर आणि चिमूटभर कात (विडे करताना घालतात तो) जिभेवर ठेवून चघळावा. त्याने खूपच आराम पडतो.

**खोकल्याची ढास येत असल्यास–** अख्खा सालासकट वेलदोडा गालात धरावा अथवा कात व साखर मिश्रण चघळावे. कफ झाला असल्यास विड्याची पाने ठेचून रस काढावा व मधाबरोबर चाटावा. छाती, पाठ शेकण्यानेही कफ सूटून येतो.



**तोंड येणे, तोंडात पुरळ –** तोंड येणे म्हणजे जीभ हुळहुळी होणे. तोंड येण्यामुळे जिभेवर फोड येतात तसेच जिभेला तिखट अजिबात लागू देत नाही. जीभ लालभडक होते. अशा वेळी दोन दिवस आहारात फक्त द्रव पदार्थ घ्यावेत. फळांचे रस, दूध, ताक, सरबत यांसारखे पदार्थ घ्यावेत. तोंड येण्यामागे बिघडलेले पचन हे मुख्य कारण आणि पोटाला दोन दिवस आराम दिला की, पोट मूळपदावर येते आणि जिभेला आलेली लाली व पुरळ कमी होण्यासही मदत मिळते.

**घशात जळजळ, घसा बसणे–** वेलदोडा दाणे व साखर एकत्र चघळणे. बसलेल्या घशावर कोमट केलेल्या मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करण्यानेही घसा दुखणे, बसणे याला उतार पडतो.

**डॉ. प्रसाद कुलकर्णी**

।।श्री।।
स्थापना : गणेश चतुर्थी १९९३
सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा
प्रकाश जठार यांचे
ज्योती एन्टरप्रायझेस
(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)
पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर, गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,
फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२

गेला काही काळ आपण निसर्गाचे ऋतुचक्र बदलत असल्याचा अनुभव घेत आहोत. विशेषतः जीवन-मरणाशी संबंधित असलेला पावसाळा फारच नखरे करताना दिसतो आहे. साहजिकच माणसाने त्याला या त्याच्या वर्तनाचा जाब विचारला. पावसाने दिलेले उत्तर आपल्याला पटतंय का पाहा!

वि. पां. गुर्जरपाध्ये
तळेगाव (दाभाडे)
मो. ९०११०८३०७३

## माणूस


माणूस पाऊस वाद जुंपला, पावसाप्रति माणूस वदला।
''का रे मित्रा का तू घोळ घातला? नित्यागमनी नेम चुकविला ।।१।।
केव्हा यावे जावे ताळ सोडला, कुठे किती बरसावे तंत्राला।
असा कसा तू साफ विसरला? असे वागणे शोभते का तुला? ।।२।।
कुठे जलप्रलये बुडवितो, तर कुठे थेंबही ना गळतो।
ईप्सित वेळी अदृश्यच होतो, नकोच तेव्हा धो धो कोसळतो ।।३।।
तू नसशी तर संकट मोठे, जीव जगविण्या आधार कुठे?
अन्नपाणी विण जीवन कुंठे, जीव सृष्टीचे अस्तित्वच उठे ।।४।।
सचेतनांना पुरवी जीवन, दिले सृष्टीने तुजला नेमून।
त्या कामी का कसली अडचण? की समजावे चुकार वर्तन? ।।५।।
असहकारा या काही कारण? व्यथा मनी का अन्याय्य शोषण?
हवें तुला कां वाढिव वेतन? त्याच्यासाठी करिसी आंदोलन ।।६।।
नेमेचि येतो मग पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा!
शिकलो बालपणींच्या त्या काळा, आज अनुभव येत निराळा'' ।।७।।

## पाऊस

उत्तर देई पाऊस हसुनी ''जग पारखिसी स्वतःवरुनी ।
दोष पदरी माझ्याच घालुनी निरपराध कां स्वतःस मानी? ।।८।।
परिस्थिती घे नीट समजुनी, तू व मी अपुली सृष्टी जननी ।
तिला राखणे समन्वयातुनी निसर्गचक्रा अभंग ठेवुनी ।।९।।
जीवन गरजा भागविताना धरतीच्या तू करिसी दोहना ।
अखंड करता परिश्रमांना विज्ञान लाभले जे वरदाना ।।१०।।
परी तुजला विज्ञान झपाटे सुख सुविधांचीही हांव सुटे ।
निसर्ग शोषणांतुनी संकटे तूच ओढविसी स्वयंललाटे ।।११।।
मर्यादांचे हो अति उल्लंघन घडे शोषण नच की दोहन ।
धरणीवर तू घाव घालुन खणून काढिसी तिज रात्रंदिन ।।१२।।
असंख्य खनिजे उपयोगासी वनसंपदाही ओरबाडिसी ।
ऊर्जा सेवा स्रोत मिळविसी परी सृष्टीला या घोर लाविसी ।।१३।।
चंगळ तुझी हो विलास चैन, बिघडे ज्या निसर्ग संतुलन ।
जलवायूंचे होत प्रदूषण पर्यावरणाचेही हो नुकसान ।।१४।।
मी नच नोकर कोणाचाही, मजला लोभ कसलाही नाहीं ।
भार सृष्टी सेवेचा मी जो वाही, बाधा तीत कुणाची तूच पाही ।।१५।।
सृष्टी सेवेचे असे माझे व्रत पर्यावरणीचे विघ्न ये त्यात ।
मार्गक्रमणी हो अनियमित या कर्माला तूच कारणीभूत'' ।।१६।।


nakhye
UDYOG
AT YOUR SERVICE
NAKHYE'S
ASHOK
SWEETS
ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.
M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - +91251 2482106, +91251 2483476.
•SHOP NO.1: Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - 97026 55000.
•SHOP NO.2: Everest Shopping Center, Phadke Rd. Dombivli (E)-421201. Tel - +91251 2433193. Mo. - 9702811122.
Shubhmangal
CATERERS & AC HALL
Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) 0251 - 2860720, 9702666000, Fax: 2483351.
Email: ynakhye@gmail.com
Website: www.shubhamangalhall.com
EVEREST
HALL
AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES
M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: 9702622000, 9702011131
EVEREST
DISTRIBUTORS
DISTRIBUTORS FOR
Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico),
Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy
Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: +91 251- 2483476, 2482106.
Fax: +91 251- 2483351. Email: anakhye@gmail.com
finVantage
EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory
M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: 91251 2480305


# कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुंबई; राज्यपालांच्या हस्ते 'flag day award' सन्मानाने गौरवांकित



दि. ७ डिसेंबर २०१७ रोजी 'आर्म्ड फोर्सेस फ्लॅग डे' च्या निमित्ताने सह्याद्री अतिथी सभागृहात झालेल्या कार्यक्रमात कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचा (२०१७च्या आर्म्ड फोर्सेस फ्लॅग डे फंडासाठी जमविलेल्या ३५ लाख रुपयांच्या निधीनिमित्त) महाराष्ट्राचे राज्यपाल सन्माननीय श्री. विद्यासागर राव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. हा सन्मान स्वीकारण्यासाठी मुंबई संघाचे विद्यमान प्रतिनिधी म्हणून संघाचे अध्यक्ष श्री. श्रीराम देव तसेच कार्याध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर व कार्यवाह श्री. हेमंत किर्लोस्कर समारंभाला उपस्थित होते. सदर समारंभात यावर्षीच्या ध्वजदिन निधीसाठी मुंबई संघाच्या वतीने एक लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

हा सन्मान मुंबई संघाच्या सर्व कार्यकर्त्यांचा तसेच मुंबई संघाचा उपक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व कऱ्हाडे ज्ञातिबांधवांचा असून या सर्वांना आम्ही तो समर्पित करत आहोत.

**– विजय आंबर्डेकर, कार्याध्यक्ष**



इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ । एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ।।२०।।
ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे पुरुषोत्तमयोगो नाम पञ्चदशोऽध्यायः ।।

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)






BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:

संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,

'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,

पुणे- ४११ ०३०

To,